cmyk

## संपादकीय

### नुसत्याच वायफळ घोषणा : शाश्वत मार्ग कुठे आहे?

राज्यातील महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आले तर कर्जमाफी करू असे संकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच दिले आहेत. राज्यातील प्रचार येत्या चार, पाच दिवसात शिगेला पोहोचला आणि महायुतीला तरीही अपेक्षित यश मिळत नाही असे लक्षण दिसू लागले किंवा जरांगे पाटील यांनी भाजपचे उमेदवार पाडण्याचे दिलेले आदेश प्रत्यक्षात उतरतील असा अंदाज आला तर कदाचित महायुतीकडून थेट कर्जमाफी करण्याची मुद्देसूद घोषणा होण्याची चिन्हे आहेत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१९९ | मंगळवार, दि.१२ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये







### उद्धव ठाकरे यांनी घेतला नरेंद्र मोदी, अमित शहांचा समाचार

# शेतकरी ३७० कलम नाही; हमीभाव मागत आहेत!

**नाशिक । प्रतिनिधी**

**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत प्रचारसभा घेण्यास सुरूवात केली आहे. सोमवारी (दि.११) त्यांनी वणीमध्ये संजय देरकर यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. यावेळी काश्मीरमधील ३७० कलम आणि शेतकऱ्यांच्या हमीभावाच्या मागणीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर निशाणा साधला. येथील शेतकऱ्याचा ३७० कलमाशी काय संबंध? असा सवाल ठाकरे यांनी यावेळी केला आहे.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी उद्धव ठाकरे यांच्यावर कलम ३७० वरून टीका केली होती. ठाकरे ३७० रद्द करत असताना विरोध करणाऱ्यांच्या बाजूला जावून बसले, असे अमित शाह यांनी म्हटले होते. यावरून आता उद्धव ठाकरे यांनी भाजपवर तोफ डागली असून शाह यांनी



डोक्याला ब्राह्मी तेल वगैरे लावावे, असा सल्ला दिला आहे. तसेच कलम ३७० रद्द करताना शिवसेनेने पहिला पाठिंबा दिला होता, त्यावेळी मी तुमच्या बाजूला होतो. पण नंतर तुम्हीच मला बाजूला केलंत, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी शाह यांच्यावर निशाणा साधला. तसेच काश्मीरमधल्या ३७० कलमाचा आणि माझ्या शेतकऱ्यांचा काय संबंध? राज्यातला शेतकरी शेतमालाला हमीभाव मागत आहे. मात्र याकडे यांचे लक्ष नाही. ते इतर मुद्यांवर बोलून दिशाभूल करत आहेत, अशी टीका ठाकरे यांनी केली आहे. ठाकरे यांनी, राज्यातल्या शेतकऱ्याच्या पिकाला भाव मिळत नसून सोयाबीनला भाव नाही, कापसाला भाव नाही, पीक नुकसान भरपाई नाही,

पान २ वर

> **“ बॅग तपासल्याने संतप्त**
>
> ठाकरे यांनी आपल्या बॅग तपासण्यात आल्याचे सांगताना संताप व्यक्त केला. ते म्हणाले, सभेला जाण्याआधी हेलिपॅडवर जात असतानाच आमच्या बॅग तपासण्यात आल्या. जशा आमच्या बॅगा तपासल्या तशा पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा अमित शाह आले तर तपासणार का? दाढीवाला मिंधे, गुलाबी जॅकेट आणि टरबुजाची (फडणवीस) बॅगा तपासणार का? असा प्रश्न केला आहे. तर हिंमत असेल तर त्यांचीही तपासा असे आवाहन ठाकरे यांनी केले आहे.

## मविआ जिंकली तर मोदींची सत्ताही जाणार–नाना पटोले



**उमरखेड । प्रतिनिधी**

**विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला पराभव दिसू लागल्याने ते हिंदू–मुस्लीम करत आहे. भाजपाचे नेते भाषणात महागाई, बेरोजगारी, शेतकरी यांच्याबद्दल बोलत नाहीत. 'बटेंगे तो कटेंगे', 'एक हैं तो सेफ हैं', च्या घोषणा देऊन जनतेची दिशाभूल करत आहेत, त्याला बळी पडू नका. जातीधर्मात फूट पाडणाऱ्या भाजपा युतीला सत्तेतून तडीपार करा, असे आवाहन करत मविआ जिंकली तर दिल्लीतील नरेंद्र मोदींची सत्ताही जाईल, असा ठाम विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला.**

नाना पटोले यांच्या प्रचाराचा धडाका सुरु असून यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचे महविकासआघाडीचे उमेदवाराच्या प्रचारासाठी घेतलेल्या सभेत नाना पटोले बोलत होते. यावेळी शिवसेना खा. नागेश पाटील आष्टीकर, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष वजाहत मिर्झा, तेलंगणाचे आमदार राममोहन रेड्डी, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल मानकर, संदेश चव्हाण, तातू देशमुख, नंदा अग्रवाल, यांच्यासह महाविकास आघाडीचे

पान २ वर

# सुरेश धस यांनी जनतेच्या प्रेमासह विश्वास मिळवला

### पंकजाताई मुंडे यांच्याकडून सुरेश धसांचे कौतुक; विजयी करण्याचे अवाहन

**शिरूर । प्रतिनिधी**

**आष्टी –पाटोदा– शिरूर विधानसभा मतदार संघामध्ये जनतेच्या प्रश्नासाठी सदैव तत्पर राहून जनतेच्या अडचणीच्या काळात त्यांना मदत करण्याचे काम सुरेश धस हे करत असतात. त्यामुळे त्यांना मोठे जनतेतून प्रेम मिळत आहे. सुरेश (आण्णा) धस यांनी जनतेचे प्रेम आणि विश्वास मिळवला आहे यामुळे जनता तर त्यांच्या पाठीशी आहे. सुरेश (अण्णा) धस हे प्रत्येकाला आपला माणूस मानतात म्हणून मतदार बांधवांनी ही त्यांना आपला माणूस म्हणून भरघोस मताधिक्याने विजयी करावे असे अवाहन माजी मंत्री तथा आ. पंकजाताई मुंडे शिरूर मध्ये केले आहे.**



आष्टी –पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीतील भाजपा व मित्र पक्षाचे उमेदवार सुरेश (अण्णा )धस यांच्या प्रचारासाठी सोमवारी सायंकाळी भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा विधान परिषदेच्या आ. पंकजाताई मुंडे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी मतदार संघातील तीनही तालुक्यातून कार्यकर्त्यांची, मतदार बांधवांची मोठी गर्दी झाली होती. उपस्थित मतदार बांधवांना संबोधित करताना पंकजाताई मुंडे यांनी भाजपाचे उमेदवार सुरेश (अण्णा) धस यांचे तोंड भरून कौतुक केले. कारण मतदार संघातील केवळ कार्यकर्तेच नाही तर तळागाळातील जनतेसाठी शेतकऱ्यांसाठी सदैव तत्पर राहणारा नेता म्हणून सुरेश धस यांचा मोठा नावलौकिक आहे. सुरेश(अण्णा ) धस हे २०१७ ला भाजपात आले. तेव्हापासून अण्णाची कार्यपद्धत मला

पान २ वर

> **नियतीचा खेळ म्हणून मी आमदार**
>
> मी खासदार व्हावे हे नियतीला मान्य नव्हते, मी आमदारच रहावे आणि तुमच्या सर्वांची सेवा करता यावी तुमच्या अंतकरणांमध्ये माझं घर असावं यासाठी लोकसभा निवडणुकीमध्ये नियतीने मला खासदार केलं नाही तर मला या समोर बसलेल्या जनतेची सेवा करण्यासाठी या जनतेत पुन्हा पुन्हा जाण्यासाठी मला आमदार केलं आहे. मी एका मतदारसंघाचे आमदार नसून मी राज्यभराची आमदार आहे त्यामुळे मला महाराष्ट्रभरातील सर्व जनतेमध्ये त्यांची सेवा करता येणार असल्याचे यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

> **महिलांची गर्दी पाहून पंकजाताईच्या चेहऱ्यावर उत्साह**
>
> आष्टी–पाटोदा –शिरूर मतदार संघातून पंकजाताई च्या सभेला कार्यकर्ते, मतदार बांधवांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये महिलांची ही मोठी लक्षणीय गर्दी दिसून आल्याने पंकजाताई च्या चेहऱ्यावर मोठा उत्साह दिसून या येत होता.

### जो माणूस रक्ताचा झाला नाही तो मतदारसंघाचा कसा होणार?

## नाव न घेता बाबरी मुंडेंचा आ.सोळंकेंवर हल्लाबोल

### बाबरी मुंडेंचे माजलगाव मध्ये रॅली व सभेच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव विधानसभेचे उमेदवार बाबरी मुंडे यांनी दि ११ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक ते जुना मोंढा मौदाना पर्यंत भव्य रॅली काढून जुना मोंढा मैदानावर पार पडलेल्या सभेत आ.प्रकाश सोळंके यांचे नाव न घेता जो माणूस रक्ताचा झाला नाही तो माणूस मतदारसंघाचा कसा होणार असा सवाल करत आ.प्रकाश सोळंकेवर हाल्लाबोल केला.**

माजलगाव विधानसभेचे उमेदवार बाबरी मुंडे यांनी दि ११ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी १२:०० वाजता भव्य शक्ती



प्रदर्शन करत छत्रपती संभाजी महाराज चौक –छत्रपती शिवाजी महाराज चौक –डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे जुना मोंढा मैदान अशी रॅली काढत रॅलीची सांगता मोंढा मैदानावर करत या ठिकाणी पार पडलेल्या सभेत बोलताना बाबरी मुंडे म्हणाले की,मि या विधानसभा निवडणुकीसाठी हारण्यासाठी नाही तर मि जिंकण्यासाठीच उभा आहे,त्यामुळे मतदारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता

पान २ वर

## राज्यातील ५० लाख ख्रिश्चन मतदारांचा मविआला पाठिंबा

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील ७५ वर्षांपासून ख्रिश्चन समाजाचा केवळ मतदानासाठी वापर केला गेला. एकही नेता विधिमंडळात पाठविण्यात आलेला नाही. परिणामी, राज्यातील ५० लाख मतदार असलेला ख्रिस्ती समाज कायम मागासलेला राहिला.**

समाजातील योग्य व्यक्तींना विधानसभा, विधान परिषदेवर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संधी, वेगवेगळ्या महामंडळांवर तसेच अल्पसंख्याक मंडळावर प्रतिनिधित्व आणि समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी पंडिता रमाबाई यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती या मुद्यांच्या पूर्ततेचे आश्वासन मिळाल्यामुळे राज्यातील ख्रिश्चन समाजाने महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. ख्रिश्चनांनी समाज म्हणून संघटित

पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयात भाजपाचा मोठा वाटा असेल–डॉ.प्रितम मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधून डॉ.योगेश क्षीरसागर यांना तिकीटाची लॉटरी लागली असे बोलले जाते. परंतु उमेदवारी मिळविण्यामागचे प्रयत्न आपल्याला दिसत नसतात. लोकसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे पंकजाताई मुंडे यांचे काम करणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासाठी आता बीडची भाजप पूर्ण ताकदीने काम करेल. त्यांच्या विजयात भाजपचा




सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास भाजप नेत्या, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला.

पान २ वर

## राजूरी गटातून आ.संदीप क्षीरसागरांना सर्वाधिक मताधिक्य देणार

**बीड । प्रतिनिधी**

**राजुरी न. जिल्हा परिषद गटातून आ.संदीप क्षीरसागरांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार राजुरी येथे झालेल्या कॉर्नर सभेतून उपस्थित नागरिकांकडून व्यक्त करण्यात आला.**

सोमवार (दि.११) रोजी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ राजुरी

पान २ वर



## वीस वर्षांपासून सोळंके परिवारासोबत एकनिष्ठ राहिलेल्या कार्यकर्त्याचा रमेश आडसकरांना पाठिंबा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**गेल्या वीस वर्षापासून सोळंके परिवारासोबत कायम एकनिष्ठ राहिलेल्या पप्पू भैया सोळंकेंनी सोमवारी रमेश आडसकरांना पाठिंबा दिल्याने राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय झाला असून या पाठिंब्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.**

पप्पू भैया सोळंके हा सोळंके परिवाराचा एकनिष्ठ कार्यकर्ता सोळंके परिवाराचा हनुमान म्हणून त्याची पंचक्रोशीत तथा माजलगाव मतदार संघात ओळख आहे. परंतु आज

पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.११ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९.५० क्विंटल | २,३६० | ३,०९० | २,६५८ |
| ज्वारी/हायब्रिड: ७२.०० क्विंटल | २,००० | २,८६१ | २,३२१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २८.०० क्विंटल | ५,७०१ | ७,६९० | ६,८४० |
| बाजरी: ४४.०० क्विंटल | १,८०० | ३,२०१ | २,७१३ |
| मुग : ३.५० क्विंटल | ५,५०० | ७,४२१ | ६,५७४ |
| सोयाबीन: ३७२.०० क्विंटल | ३,५०० | ४,२५१ | ४,००२ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# बहीण–भाऊ एकत्र मिळून परळीच्या सर्वांगीण विकासासाठी काम करु– ना.मुंडे

### गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचे परळीत दीपावली स्नेहमिलन;मुंडे बहीण–भावाची उपस्थिती

### राजकारणातील चिखलात 'कमळ' बनून समर्पित भावनेने काम करतेय–आ.पंकजाताई

**परळी वै. । वार्ताहर**

**भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी शहरात भाजपा कार्यकर्त्यांचा दीपावली स्नेहमिलन सोहळा अतिशय थाटात पार पडला. या सोहळ्यात मुंडे बहीण–भावाने केलेल्या मनमोकळ्या भाषणात नात्यांचा ओलावा दिसून आला. राजकारणातील चिखलात मी 'कमळ' बनुन काम करतेयं असं सांगत आ. पंकजाताई मुंडे यांनी या निवडणूकीत आपल्याला गुलाल उधळायचा आहे, त्यासाठी महायुतीचे**




उमेदवार धनंजय मुंडे यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करा असे आवाहन केले तर आम्ही दोघे बहीण–भाऊ एकत्र आहोत,



**परळीच्या सर्वांगीण विकासासाठी मिळून काम करु असा शब्द उमेदवार धनंजय मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला.** शहरातील बीकेएस गार्डन येथे पार पडलेल्या या मेळाव्यात व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते बंकटराव कांदे, दत्ताप्पा इटके, जीवराज ढाकणे, शिवाजीराव गुट्टे, श्रीहरी मुंडे, शांतीलाल जैन, डॉ. हरीश्चंद्र वंगे, तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, वैजनाथ जगतकर, अंबाजोगाईचे शामराव आपेट, गणेश कराड, जीवनराव किर्दंत, अविनाश मोरे आदींसह मतदारसंघातील सर्व बुथ प्रमुख,

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नुसत्याच वायफळ घोषणा : शाश्वत मार्ग कुठे आहे?

राज्यातील महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आले तर कर्जमाफी करू असे संकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच दिले आहेत. राज्यातील प्रचार येत्या चार, पाच दिवसात शिगेला पोहोचला आणि महायुतीला तरीही अपेक्षित यश मिळत नाही असे लक्षण दिसू लागले किंवा जरांगे पाटील यांनी भाजपचे उमेदवार पाडण्याचे दिलेले आदेश प्रत्यक्षात उतरतील असा अंदाज आला तर कदाचित महायुतीकडून थेट कर्जमाफी करण्याची मुद्देसूद घोषणा होण्याची चिन्हे आहेत. तसे झाले तर राज्यातील १५ लाख ४६ हजार ३७९ थकबाकीदार शेतकऱ्यांची ३० हजार ४९५ कोटी रुपयांची कर्जमाफी करावी लागेल. राज्याच्या तिजोरीची अवस्था लक्षात घेतली तर हा खूप मोठा बोजा असेल, ज्याचा परिणाम राज्याच्या तिजोरीवर आणि कल्याणकारी योजना ठप्प होण्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. १७ जिल्हे म्हणजे जवळपास निम्मा महाराष्ट्र सध्या थकबाकीदार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सधन मानल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सुद्धा शेतकऱ्यांनी कर्जे भागवलेली नाहीत. केवळ जुनी कर्ज फिरवून नवी करण्यात आली म्हणून ते थकबाकीत दिसत नाहीत. अन्यथा या जिल्ह्यांची अवस्था सुद्धा फारशी वेगळी नाही. अशा स्थितीत सरकार कर्जमाफीचा निर्णय घेत असेल तर तो केवळ निवडणुकीपुरता उपयुक्त ठरेल.

यापूर्वी ठाकरे सरकारने २०१९ मध्ये कर्जमुक्तीचा निर्णय घेतला होता. मात्र पाच वर्षानंतर सुद्धा शेतकऱ्यांची अवस्था बदललेली नाही, हे वरील आकडेवारी दर्शवते. याचाच अर्थ शेतकऱ्यांची कर्जमाफी करणे हे एकच शेतीच्या प्रश्नावर उत्तर नाही. शेतीच्या प्रश्नाचे मूळ उत्तर हे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आहे. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून साडे तीन दशके होत आली तरी कृषी क्षेत्राला आपण मुक्त अर्थव्यवस्थेत जाऊ दिलेले नाही. एका अर्थाने शेतीत अद्यापही जुनेच समाजवादी धोरण कायम आहे. आपण समाजवादी व्यवस्था चालवायची की मुक्त अर्थव्यवस्था? याचा निर्णय मुक्त अर्थव्यवस्थेच्या समर्थक असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेतृत्वाखालील भाजपला वाजपेयी यांच्या काळात घेता आला नाही आणि तीन वेळा सत्ता मिळून सुद्धा तो निर्णय मोदी घेतील अशी चिन्हे नजीकच्या काळात तरी दिसत नाहीत. परिणामी या प्रश्नावर तोडगा निघणार कसा हा प्रश्न आहे. किमान काही निर्णय घेऊन त्या मार्गाने वाटचाल सुरू झाली पाहिजे. शेतमालाला चांगला भाव हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे ज्याकडे सर्वजण दुर्लक्ष करतात. शेतमालाचा दर पडेल कसा याचीच धोरणे आखली जातात. लोकसभा निवडणुकीच्या काळात सुद्धा कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळत होता. कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे तर या काळात वाटोळे झाले. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा मोदी सरकारवर रोष दिसून आला आणि मोठ्या प्रमाणावर महायुतीचे लोकसभेचे उमेदवार पराभूत झाले. आता सुद्धा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कांद्याचे दर वाढले आहेत मात्र शेतकऱ्यांकडे कांदा उपलब्ध नाही. कापूस आणि सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे आणि त्याचे परिणाम सत्ताधारी आघाडीला ठिकठिकाणी लोकांकडून प्रश्न विचारण्यात होत आहेत. कापूस आणि सोयाबीनचा पट्टा हा वर्षानुवर्षे भाजपला साथ देत आला होता. मात्र भाजपच्या सुवर्णकाळात त्या शेतकऱ्यांना न्याय देणे त्यांना विविध कारणांमुळे जमले नाही. हवामानाचा त्यावर मोठा परिणाम होताच. याशिवायही केंद्र सरकारचे आयात निर्यात धोरण धरसोडीचे असल्यामुळे आणि कांदा व इतर वस्तूंवर निर्यात शुल्क लागू करून सरकारने या शेतकऱ्यांना दुखावले होते. त्याचा परिणाम आजही दिसत आहे. शेतकरी कर्जबाजारी होण्यामागे या धोरणांचा फार मोठा वाटा आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी व्हायला तयार नाही. काँग्रेसने मुक्त अर्थव्यवस्था भारतात लागू केली मात्र त्यांना सुद्धा शेती क्षेत्रात नेमके करायचे काय याबाबतचा गोंधळ सोडवता आलेला नाही. उत्पादन वाढ करणे आणि शेतकऱ्यांचा नफा वाढवणे हा एक चांगला पर्याय असला तरी त्याच्या बाबतीत सुद्धा अद्यापपर्यंत ठोस असे कार्यक्रम आखले गेले नाहीत. शरद पवार यांच्या कृषिमंत्री पदाच्या कारकीर्दीत काही पिकांच्या बाबतीत ते धोरण यशस्वी झाले. त्यामागे शरद जोशींनी टास्क फोर्सद्वारे दिलेला विचारही होता. याचाच अर्थ देशातील एक चांगले धोरण महाराष्ट्रातल्या दोन व्यक्तींनी राबवले होते. मग जेव्हा महाराष्ट्रात हे प्रश्न निर्माण होतात तेव्हा त्या धोरणाकडे दुर्लक्ष का? त्याकाळात भारतातील आयात थांबली, परदेशी चलन वाचले, शेतकऱ्यांना पैसा मिळाला. पुढे हे धोरण ठप्प झाले आणि देशात अन्नाचा तुटवडा, गहू, तांदळासाठी सुद्धा परदेशाकडे पाहणे आणि युद्धकाळात जगाचे पोट भरु असे सांगितले असताना सुद्धा देशांतर्गत मागणी सुद्धा पूर्ण करता न येणे हे आपल्या यंत्रणेचे अपयश ठरलेले आहे. भारत सरकार आणि इथला शेतकरी निर्यात करण्यासाठी सुद्धा अन्नधान्य पिकवू शकत नाही किंवा जगाची गरज पूर्ण करू शकत नाही अशी स्थिती आहे. ही स्थिती स्वत:हून ओढवून घेतली आहे. यासाठी यावर शाश्वत मार्ग काढण्याची गरज असून, नुसत्या घोषणा करून मार्ग निघणार नाही.

## वनविभागाच्या दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर विहिरीत पडलेल्या नील गाईला जीवदान

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील सहा परस विहिरीत पडलेल्या नील गाईला वाचविण्यात वन विभागाला यश आले सदर गाईला सुखरूप बाहेर काढण्यासाठी वन विभागाच्या टीमने केलेल्या तब्बल दोन तासांच्या प्रयत्नानंतर नील गाईला सुखरूप बाहेर काढण्यात अखेर यश आले.**



आष्टी तालुक्यातील खरकटवाडी परिसरात वनक्षेत्रालगत असलेल्या शेतातील विहिरीला संरक्षक कठडे नसल्याने नील गाय सहा परस खोल विहिरीत पडली या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी तात्काळ आले त्यांनी दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर वनविभागाच्या टीमला नील गाईला वाचविण्यात यश आले यात वनविभागाचे वन परिक्षक अधिकारी ढगे साहेब वन पाल कडा तागड साहेब ,वनरक्षक काळे साहेब, पडलकर साहेब, वनकर्मचारी बन्सी तांदळे,कानिफ पवार गोरख पवार , जयसिंग मोहिते , अशोक पाथरकर, दत्तात्रय भुकण, इन्नुस शेख ज्ञानेश्वर मोहिते आदी होते.

## उद्धव ठाकरे गटाचे खा.संजय राऊत यांच्या वक्तव्याचा व्यापाऱ्यांकडून निषेध!

**जालना । प्रतिनिधी**

**समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आणि अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण कणा असणाऱ्या व्यापारी वर्गाला चोर, खोटारडे, भेसळखोर संबोधून व्यापाऱ्यांचा अपमान करणारे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांचा व्यापारी आघाडीतर्फे निषेध नोंदविण्यात आला आहे. विधानसभा निवडणुका जिंकण्याच्या नादात कुणालाही चोर म्हणणार का? असा सवाल उपस्थित करत व्यापाऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता खा. राऊत यांनी तात्काळ माफी मागावी, अशी मागणी व्यापारी यांच्याकडून करण्यात आली आहे.**

प्रसारमाध्यमांशी बोलतांना संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टिका करतांना त्यांना व्यापाऱ्याची उपमा देत व्यापारी हे खोटारडे आणि भेसळखोर असल्याबाबतचे वक्तव्य केले. या पार्श्वभूमीवर मनोज पाचफुले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हंटले आहे की ,राऊतांचे वक्तव्य समस्त व्यापाऱ्यांचा अवमान करणारे आहे. वास्तविक व्यापारी हा जनतेच्या दैनंदिन जीवनातील महत्वपूर्ण घटक असून सर्वाधिक कर व्यापाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे जमा होतो. त्यामुळेच व्यापाऱ्यांना अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा कणा मानले गेले असे मनोज पाचफुले यांनी नमूद केले. १२ ते १८ तास जनतेला निस्वार्थ सेवा देणारा व्यापारी हा राऊतांना चोर का वाटतो, व्यापाऱ्यांची मेहनत, चिकाटी, समर्पण आणि इमानदारी दिसत नाही का? असा प्रश्न मनोज पाचफुले यांनी उपस्थित केला. खा. संजय राऊत यांनी व्यापाऱ्यांबद्दल केलेल्या अवमानकारक वक्तव्याबद्दल तात्काळ माफी मागावी, अन्यथा व्यापाऱ्यांच्या संतापाचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा मनोज पाचफुले यांनी दिला आहे.

## मणिपुरात पोलिस ठाण्यावर हल्ला करणारे ११ अतिरेकी ठार

**जिरीबाम। प्रतिनिधी**

**मणिपूरमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाने मोठी कारवाई केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मणिपूरच्या जिरीबाममध्ये झालेल्या चकमकीत सीआरपीएफने ११ अतिरेक्यांचा खात्मा केला आहे. या चकमकीत सीआरपीएफचा दोन जवान जखमी झाल्याचीही माहिती आहे.**

सीआरपीएफच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी सीआरपीएफच्या पथकावर हल्ला केल्यानंतर ही चकमक सुरु झाली होती. अतिरेक्यांच्या बाजूने सीआरपीएफच्या पथकावर मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. त्यानंतर सीआरपीएफच्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. या पोलिस ठाण्याजवळ विस्थापितांसाठी मदत शिबिरही आहे. या मदत शिबिराला लक्ष्य करण्याचा हल्लेखोरांचा कट होता. जिरीबाममधील बोरोबारका पोलीस ठाण्याला अलीकडच्या काही महिन्यांत अनेकदा लक्ष्य करण्यात आले आहे. त्यांतर सोमवारी पुन्हा एकदा हल्ला करण्यात आला. बोरोबेकरा पोलिस ठाण्यांतर्गत जाकुराधोर येथेही अतिरेक्यांनी तीन ते चार घरे जाळली आहेत.

## माधव तात्या निर्मळ यांचा साठे नगरमध्ये जनसंवाद

### स्थानिक जनतेने केलेल्या स्वागताने भारावले माधव निर्मळ

**धारूर । प्रतिनिधी**

**आज माजलगाव विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने किल्ले धारूर शहरातील साठे नगर येथे आयोजित जनसंवाद दौऱ्यात माधव तात्या निर्मळचे भव्य स्वागत करण्यात आले. स्थानिक मतदार जनतेच्या उपस्थितीत तरुण मतदार बंधू आणि ज्येष्ठ नागरिक मंडळींनी मान–सन्मानाने स्वागत केले.**

या संवाद साधण्यात माधव तात्या निर्मळनी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार म्हणून उपस्थित जनतेच्या समस्यांबद्दल बोलले. त्यांनी स्पष्ट केले की, ''मी नागरिकांच्या समस्यांसाठी सदैव तत्पर राहीन आणि त्या सोडविण्यासाठी माझी पूर्ण मेहनत असेल.'' यावरून असे दिसून आले की, माजलगाव विधानसभा मतदारसंघात शाश्वत विकासासाठी बदलाची आवश्यकता जनतेच्या मनात ठरलेली आहे. माधव तात्या निर्मळ पुढील पाच वर्षांसाठी शेतकऱ्यांना आणि बेरोजगारांना उद्योगनिर्मितीत सहभागी करून



उद्योजक बनवण्याचे ध्येय उराशी बाळगले आहे. त्यांनी मतदारांना आवाहन केले की, ''आपण आपले मतदान रूपी आशीर्वाद द्यावे, त्यामुळे मी मतदार संघातील गोर गरीब जनतेची सेवा करण्याची संधी मिळवू शकेन.'' यावेळी त्यांनी जनतेला आश्वासन दिले की, ''एकवेळ संधी दिली तर नक्कीच मतदारसंघात शाश्वत विकास घडवू शकेन.'' या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण युवक उपस्थीत होते. माधव तात्या निर्मळ यांच्या भाषणाने उपस्थितांना प्रोत्साहन मिळाले आणि त्यांनी त्यांच्याशी संवाद साधताना विविध समस्यांचे स्वरूप समजून घेतले.

## पान १ वरून...

### उद्धव ठाकरे यांनी घेतला नरेंद्र मोदी,

पीक विमा नाही. की येथील युवकांना रोजगार नाही. तुमचे ३७० कलम माझ्या शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापसाला भाव देऊ शकत नाही. मग येथे येऊन कशाला ३७० कलम हटवले असक सांगता? असा सवाल केला आहे. अदानीला वाढवण बंदर, एअरपोर्ट दिली जात आहेत. वीज प्रकल्प दिली जात आहेत, आम्ही याला विरोध करणारच, असाही हल्लाबोल ठाकरे यांनी केला आहे.

------------

### सुरेश धस यांनी जनतेचे प्रेम

चांगलीच भावून गेली आहे. कोरोना सारख्या महामारीच्या संकटामध्ये सुरेश (अण्णा) धस ही सदैव जनतेमध्ये जाऊन त्यांना मदत मिळावी, योग्य ते उपचार मिळावे यासाठी कोविड सेंटर उभारून जनतेची सेवा करत होते. एवढेच नव्हे तर शेतकऱ्याच्या प्रत्येक प्रश्नासंदर्भात ते मोठे जागरूक राहून त्यांचे प्रश्न सोडत असतात . यामुळे सुरेश धस यांनी जनतेचे प्रेमच नव्हे तर मोठा विश्वास ही मिळवला आहे यामुळे त्यांचा या विधानसभा निवडणुकीमध्ये विजय निश्चित झाला आहे. आष्टी -पाटोदा -शिरूर विधानसभा मतदारसंघातील जनतेने मोठे मताधिक्य देऊन महायुतीचा मुख्यमंत्री व्हावा यासाठी विधानभवनामध्ये वर हात करण्यासाठी सुरेश (अण्णा) धस यांना विजयी करावे असे अवाहन माजी मंत्री तथा विधान परिषदचे आ.पंकजाताई मुंडे यांनी शिरूर येथे केले आहे. यावेळी व्यासपीठावर भाजपाचे वरिष्ठनेते चंदूलानी साहू,भाजपा उमेदवार सुरेश (अण्णा )धस, ज्येष्ठ नेते विजय गोल्हार, भाजपा नवनिर्वाचित जिल्हध्यक्ष शंकर देशमुख, शिरूरचे नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, रविराज बडे, फैयाज भाई शेख, रिपाईचे अरुण भालेराव, रासपचे श्याम महानोर,भाजपा तालुका अध्यक्ष सुरेश उगलमुगले, रोहित भैया पानसंबळ,संतोष जाधव, बाबुराव केदार, महेंद्र गर्जे, वैजनाथ खेडकर, राहुल चौरे, प्रकाश खेडकर, डॉ. मधुसूदन खेडकर, खरमाटे मामा, शरद ढाकणे आदीसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

------------

### मविआ जिंकली तर मोदींची

पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारात यवतमाळमध्ये 'चाय पे चर्चा' कार्यक्रमात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, शेतमालाला हमीभाव देऊ तसेच सत्तेत आल्यानंतर पहिली सही शेतकरी कर्जमाफीवर करेन असे आश्वासन दिले होते, पण सत्तेत येताच नरेंद्र मोदींनी ते सर्व चुनावी जुमले होते असे सांगत शेतकऱ्यांचा विश्वासघात केला. आता देवेंद्र फडणवीस मोदींसारखेच शेतकऱ्यांना आश्वासन देत, सत्तेत आलो तर शेतमालाला हमीभाव देण्याची भाषा करत आहेत. ११ वर्षांपासून केंद्रात नरेंद्र मोदींचे सरकार आहे, मागील ७.५ वर्ष देवेंद्र फडणवीस सत्तेत आहेत, याकाळात त्यांनी केले, हे आधी सांगावे, बळीराजाला खोटी आश्वासने देऊन त्यांची फसवणूक करू नका. आता शेतकरी भाजपाच्या या थापेबाजाली बळी पडणार नाही, असेही यावेळी सांगितले.

--------

### डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या विजयात

मुंडे बहिण–भावाने बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयासाठी पूर्ण ताकद पाठीशी उभी केली असून त्यांच्या प्रचारार्थ बीडमध्ये डॉ.प्रितमताई मुंडे यांची सोमवारी (दि.११) प्रचार सभा पडली. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर डॉ.प्रितमताई मुंडेंसह उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तांदळे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, चंद्रकांत फड, अजय सवाई, नवनाथ शिराळे, जगदीश गुरखुदे, अशोक लोढा, संगिता धसे, सलीम जहांगीर, देविदास नागरगोजे, जालिंदर सानप, वैजनाथ मिसाळ, विक्रांत हजारी यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीतील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.प्रितमताई मुंडे म्हणाल्या की, आपल्याला डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने उच्चशिक्षित, संयमी उमेदवार लाभला आहे. त्यांनी लोकसभा निवडणुकीत कुठलेही किंतू–परंतु न करता प्रामाणिकपणे पंकजाताई मुंडे यांचे काम केले. आता त्यांच्यासाठी आपल्याला पूर्ण ताकदीने काम करायचे आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका पुन्हा करायच्या नाहीत. डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधानसभेत पाठवायचे आहे, अशा शब्दात डॉ.प्रितमताई मुंडे यांनी यांनी विजयी करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचलन करून शांतिनाथ डोरले यांनी आभार मानले.

**डॉ.योगेश क्षीरसागर यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान करू**

मेळाव्यातून भाजपच्या अनेक नेत्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांच्यासाठी प्रामाणिकपणे काम केले. त्यामुळे आता त्यांना विजय करण्यासाठी जीवाचे रान करू, असा शब्द भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**बीडची 'घडी' बसविण्याची 'वेळ' आली आहे–डॉ.योगेश क्षीरसागर**

मी कायम विकासाच्या मुद्द्यावर राजकारण, समाजकारण करत आलो आहे. आता बीड विधानसभा व जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक 'घडी' बसविण्याची 'वेळ' आली आहे. महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना माझ्याकडून कायम सन्मानाची वागणूक मिळेल. स्थानिक स्वराज्य संस्थेसह इतर ठिकाणी सर्वांना समान वाटा मिळेल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

------------

### राज्यातील ५० लाख ख्रिश्चन

होण्याचा निर्धार केला आहे. समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली. समाजाच्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिल्यामुळे महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे विजय बारसे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. आगामी महापालिका निवडणुकीमध्ये ख्रिश्चन समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले नाही तर पाठिंब्याचा फेरविचार केला जाईल, असेही सांगितले.

-------

### नाव न घेता बाबरी मुंडेचा

मला मतदान करुन निवडून द्यावे तसेच आज जे उमेदवार राष्ट्रवादी शरद पवार गट व अजित पवार गटाच्या उमेदवारांनी लोकसभेला पंकजाताई मुंडे यांचा प्रचारा दरम्यान इमानेइतबारे काम न करता स्टेजवर एक व स्टेज खाली उतरले की मतदारांना आपापल्या परीने काम करण्याचे सांगुन पंकजाताई मुंडेच्या पाठीमागून पाठीत खंजीर खुपसन्याचे काम केले आहे.तसेच या मतदारसंघात निवडणूक लढवत असलेले शरद पवार गट,अजित पवार गट व दोन्ही अपक्ष उमेदवार हे कधीही मुंडे घराण्यांशी एकनिष्ठ होते ते त्यांनी सांगावे, राजकारणात आणी समाजकारणात मुंडे घराण्यांशी फक्त आणी फक्त आमचंच कुटुंब एकनिष्ठ राहिले आणी भविष्यात देखील राहिल अशी ग्वाही देत,जो माणूस राजकीय निवृत्ती घेत पुतण्याला वारस घोषित करुन ऐनवेळी स्वा:ताची उमेदवारी घोषित करणारा माणूस जो रक्ताचा झाला नाही तो मतदारसंघाचा कसा होणार असा सवाल करत आ.प्रकाश सोळंके यांचे नाव न घेता बाबरी मुंडे यांनी हाल्लाबोल केला केला.त्यामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी कोणत्याही अफवांना व भुलथापांना बळी न पडता मला मतदान करुन निवडून देण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.यावेळी प्रा.उदयभान राठोड, संजिवनी राऊत यांनी आपले विचार व्यक्त केले.

**निवडून आलोत, किंवा पडलोत तरीही मुंडे घराण्यांशी एकनिष्ठ – राजाभाऊ मुंडे**

बाबरी मुंडे यांच्या प्रचारार्थ जुना मोंढा मैदानावर पार पडलेल्या सभेत प्रास्ताविक करताना राजाभाऊ मुंडे म्हणाले की, पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडेना आघाडी व युतीधर्मा मुळे त्यांची राजकीय अडचण असु शकते मात्र आतुन का होईना पण त्यांचा आम्हाला पाठिंबाच आहे,तसेच या विधानसभा निवडणुकीत आम्ही पडलोत किंवा निवडून आलोत तरीही आम्ही मुंडे घराण्यांशी एकनिष्ठच राहुत, राजकारणात जो आम्हाला सहकार्य करेल त्याला आमचं सहकार्यच राहील,मात्र जो आम्हाला विरोध करेल त्याला सुद्धा आमचा विरोधच राहिल असे खडेबोल देखील त्यांनी यावेळी सुनावले

----------

### वीस वर्षांपासून सोळंके परिवारासोबत एकनिष्ठ

पप्पू भैया सोळंके यांनी अचांनक अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना पाठिंबा दिल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. पप्पू भैया सोळंके हा गेल्या वीस पंचवीस वर्षांपासून सोळंके परिवारा सोबत कायम एकनिष्ठ राहिला त्याने स्वतःच्या गावात लोकनेते स्वर्गीय सुंदरराव सोळंके साहेबांच्या नावाने स्वागत कमानही उभारली होती तसेच प्रत्येक राजकीय चढ–उतार तसेच सुख दुःखात पप्पू भैया सोळंके हा सोळंके परिवारासोबत कायम एकनिष्ठ राहिला होता.त्याची एकनिष्ठता माजलगाव मतदार संघात कौतुकाचा विषय होती. परंतु आज त्याच पप्पू भैया सोळंके यांनी प्रकाश सोळंकेची साथ सोडून अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना त्यांच्या निवडणुकीत जाहीर पाठिंबा दिला आहे दरम्यान पप्पू भैया सोळंके सारखा एकनिष्ठ कार्यकर्त्या सोबत असे काय घडले की ज्यामुळे सोळंके परिवाराच्या या कडवट कार्यकर्त्याला प्रकाश सोळंके यांची सोडावी वाटली. एवढा एकनिष्ठ व कडवट कार्यकर्ता जर प्रकाश सोळंकेची साथ सोडून जात असेल तर सामान्य कार्यकर्त्यांचे काय हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.रमेश आडसकरांनी पप्पू भैया सोळंके यांचे स्वागत केले असून त्यांचा उचित सन्मान राखला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

----------

### राजूरी गटातून आ.संदीप क्षीरसागरांना

नवगण जिल्हा परिषद गटाची कॉर्नर सभा राजुरी येथील श्री मंगलमूर्ती देवस्थान परिसरात पार पडली. या सभेसाठी राजुरी नवगण जिल्हा परिषद गटातील सर्व गावातून नागरिक उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी एकमुखाने, आ.संदीप क्षीरसागर यांना आम्ही आमच्या गटातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे एकमताने उपस्थितांनी सांगितले.

----------

### बहीण–भाऊ एकत्र मिळून परळीच्या

शक्ती केंद्र प्रमुख व सरपंच, चेअरमन व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रसंगी पुढे बोलताना आ.पंकजाताई म्हणाल्या की, 'मी माझ्या आयुष्यात कधीच कोणतेही वाईट काम केले नाही. आमदार झाले, मंत्री झाले आणि पालकमंत्री झाले. या माध्यमातून जिल्ह्यासाठी व परळीसाठी अभूतपूर्व असे काम केले. आयुष्यात सर्व काही मिळाले आहे. आता लोकनेते मुंडे साहेबांची आणि पूर्वजांच्या पुण्याईची शिदोरी गोरगरीब, सर्वसामान्य,गरजू लोकांसाठी खर्च करायची आहे. समाजासाठी समर्पित भावनेने काम करायचे हा निश्चय घेऊन आम्ही काम करत आहोत. जीवनात काही चांगले केले असेल तर ते म्हणजे गोपीनाथगड उभारण्याच काम मी केलं आणि कधीच कोणत्याही वाईट कामात सहभागी झाले नाही याचा मला अभिमान आहे. लोकसभेची निवडणुक लढवली, या निवडणुकीत माझे बंधू धनंजय मुंडे माझ्यासोबत राहिले, त्यांनी माझा प्रचार केला याचा मला मनस्वी आनंद झाला. त्यांचे नेते, कार्यकर्ते देखील माझ्या प्रचारात सहभागी झाले. सर्वांनी सांगितल की, पंकजाताई आम्ही तुमच्यावर नाराज नाहीत, तुम्ही कधीच आमच्या विरोधात आमचे वाईट करण्याच्या हेतूने कोणतीही कृती केलेली नाही. याच कारण म्हणजे राजकारणाच्या चिखलात 'कमळ' बनून काम करायच' ही शिकवण मला मुंडे साहेबांनी दिल्याने हे शक्य झालं असे त्या यावेळी म्हणाल्या.

**धनंजय मुंडेंना मताधिक्य द्या**

देशाच्या राजकारणात अनेक कुटुंब एकमेकांविरोधात लढत आहेत, अनेक ठिकाणी पातळी सोडून आणि मर्यादा ओलांडून भांडण केली जात आहेत. परंतु आम्ही आजपर्यंत कधीही पातळी सोडून राजकारण केले नसल्याचे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले. तसेच राज्यातल्या अनेक मतदारसंघात युती, आघाडीतील नेते, कार्यकर्ते आपापसात भांडत आहेत परंतु आपल्या मतदारसंघात युतीतील सर्व पक्षाचे कार्यकर्ते एकदिलाने काम करत आहेत. आपल्या उमेदवाराला जास्तीत जास्त मताधिक्याने विजयी करून आपल्याला गुलाल उधळायचा आहे. विरोधातील उमेदवारांची आपल्याशी तुलना होऊ शकत नाही. मतदारसंघात विविध विकास कामे, सामूहिक विवाह सोहळा असे अनेक लोकोपयोगी कार्यक्रम आपल्या उमेदवाराने आजपर्यंत राबवले आहेत. आणि म्हणून धनंजय मुंडे यांचा विजय निश्चित आहे, या विजयात त्यांना अधिकाधिक मताधिक्य देण्यासाठी तालुका, जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गण स्तरावर आणि शहरात समन्वयक नेमून एकजुटीने काम करा आणि धनंजय मुंडे यांना विजयी करा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

**आम्ही एकत्र आलो, याचा आनंद – धनंजय मुंडे**

यावेळी बोलताना धनंजय मुंडे यांनी मागील काही वर्षातील घडलेल्या अनेक आठवणींना उजाळा दिला. लोकसभा निवडणुकीत जे झाले त्या अनुभवातून आता सर्वांनी मिळून काम करावे लागेल. आपल्या सोबतीला राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप एकत्र मिळून काम करत आहे. पूर्वीही अनेक वर्ष आपण एकत्र काम केलेले आहे, त्यामुळे आपले जुळायला फार वेळ लागला नाही. एकत्र असताना प्रत्येक पदाधिकारी–कार्यकर्त्यांना योग्य न्याय व सन्मान दिला जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी पुढे बोलताना स्पष्ट केले. राज्यात महायुती साकारली आणि आम्ही दोघे बहीण भाऊ एकत्र आलो. याचा सर्वांनाच आनंद झाला. आम्हालाही झाला. आज एक आहोत, भविष्यातही असेच एक राहू. आज एकत्र येऊन काम करत असताना परळीत दोन आमदार होतील आणि माझ्या विजयात सिंहाचा वाटा पंकजाताईंचा असेल. निवडणुका पार पडल्यानंतर महायुतीचे राज्यात सरकार येणार आहे. त्या सरकारमध्ये आ.पंकजाताई यांना नक्कीच मोठी संधी मिळणार आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी ताईंच्या मंत्रिपदाचे संकेत दिले.

-------------

cmyk

# मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवावेत, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत.

बीड तालुक्यातील चौसाळा, गेवराईतील गेवराई, गुळज, मारफळा, राजपिंप्री, मालेगाव खु., किनगाव, शिरूर कासारमधील जाटनांदूर, मातोरी, पाटोद्यातील पिठ्ठी, आष्टी तालुक्यातील पिंपळा, दौलावडगाव, खडकत, आष्टा ह.ना. केरूळ, डोईठाण, हातोला, माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी, एकदरा, गंगामसला, माजलगाव, वडवणी तालुक्यातील वडवणी, अंबाजोगाईतील लोखंडी सावरगाव, केजमधील लव्हुरी, बोरगाव बु., परळी तालुक्यातील पोहनेर, नागापूर याठिकाणी मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार अन्य दिवशी भरवावेत, असेही आदेशात नमूद आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४




# इव्हीएम यंत्रांचे द्वितीय सरमिसळीकरण पूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या इव्हीएम यंत्रांचे द्विती य सरमिसळीकरण प्रक्रिया आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली.



जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात पाठविण्यात येणाऱ्या इव्हीएम यंत्रांचे रॅन्डमायझेशन (यादृच्छिकीकरण) पद्धतीने सरमिसळीकरण करण्यात आले. ही प्रक्रिया गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक लालटनपुई वाँगचाँग, बीड व आष्टीचे निवडणूक निरीक्षक भुवनेश प्रताप सिंह, केज व परळी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक, प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी सहाही मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सर्वश्री सतीश धुमाळ, गौरव इंगोले, श्रीमती कविता जाधव, श्रीमती वसिमा शेख, दीपक वजाळे व अरविंद लाटकर यांची उपस्थिती होती. या प्रक्रियेचे अवलोकन करण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवारही उपस्थित होते. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांना या प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सविस्तर माहिती दिली. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांनीही या प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले.

ही प्रकिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख, तंत्रज्ञ विश्वजीत लांडगे, एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी भाऊसाहेब बांगर, महादेव भोकरे, तानाजी हंगरगेकर यांनी परिश्रम घेतले.

**परळीत एक, माजलगावात तीन बॅलेट युनिट**

या प्रक्रियेत पाच हजार ८३८ बॅलेट यूनिट, दोन हजार ९४७ कंट्रोल यूनिट आणि तीन हजार १८९ व्हीव्हीपॅट यंत्रांचे सरमिसळीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यात केवळ परळी मतदारसंघात एक बॅलेट युनिट प्रति मतदान केंद्रांवर लागणार आहे. तर माजलगाव मतदारसंघात प्रति मतदान केंद्रांवर तीन बॅलेट युनिट लागणार आहेत. गेवराई, बीड, आष्टी व केज या मतदारसंघात प्रति मतदान केंद्रांवर प्रत्येकी दोन याप्रमाणे बॅलेट युनिट लागणार आहेत. जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात मतदान केंद्रांच्या संख्येनुसार १२० टक्के प्रमाणात मतदान यंत्रे पुरविली गेली असल्यामुळे मतदान यंत्रांची कसलीही कमतरता नसल्याचे निवडणूक विभागाने कळवले आहे.



बीड : शरदचंद्रजी पवार हे हॉटेल सनराईज बीड येथे मुक्कामी थांबले असता हॉटेल मॅनेजमेंट च्या वतीने सत्कार करताना भिमराव पाखरे व आदी

# आष्टी तहसिल,गटशिक्षण कार्यालय व समाजकल्याण विभागाच्या वतीने दिव्यांग मतदार रॅली संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

दिव्यांगांचा निवडणुकीत सहभाग वाढावा तसेच त्यांना मतदान सुलभरित्या करता यावे, यासाठी देशभर जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत आष्टी शहरातून दिव्यांग मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.निवडणूक आयोग, गटशिक्षण समाजकल्याण विभागाच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



यंदाच्या लोकसभा निवडणुकीत दिव्यांग मतदारांना मतदान करताना अडचणी येणार नाहीत,याबाबत काळजी घेण्यात येत आहे.याबाबत मतदारांमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.जनजागृती करण्याच्या उद्देशाने शहरातून रॅली काढण्यात आली. त्यानंतर निवडणूक वापरण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशीनचे प्रात्याक्षिक जिल्हापरिषद मुलांची शाळा येथे सोमवार (दि.११)रोजी दु.११ वा.आयोजित करण्यात आले होते.या वेळी दिव्यांग मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी मतदारांना मार्गदर्शन करण्यात आले.दिव्यांगांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.यावेळी निवडणूक विभागातील अधिकारी उपस्थित होते.मतदानापासून दिव्यांग मतदारही वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोगाने जोरदार तयारी केली आहे.दिव्यांगांना व्हीलचेअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.तसेच विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत.दिव्यांग व्यक्तींना मतदान प्रक्रिया सहजसुलभ व्हावी, त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग मोठ्या संख्येने वाढावा.याकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली पाटील यांनी सांगितले आहे.

# दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमात सामाजिक सलोख्याचे दर्शन

## डॉ.ओमप्रकाश शेटेंच्या निवासस्थानी सर्वपक्षीय उमेदवारांची वर्दळ

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील शेटे फार्म हाऊस परिसरातील शुभन महागणपती मंदिर प्रांगणात दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. डॉ.ओमप्रकाश शेटे आयोजित कार्यक्रमात स्नेहीजनांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. जात, धर्म व पक्षाच्या पलीकडे जाऊन सामाजिक सलोखा व बंधुभाव जपणाऱ्या या कार्यक्रमात विविध पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व विधानसभेचे सर्वच प्रमुख उमेदवार आवर्जून उपस्थित होते. सामाजिक सलोख्या सोबतच राजकीय सलोखा देखील या ठिकाणी पाहायला मिळाला.



आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने दरवर्षी दीपावली निमित्त इष्ट - मित्र व स्नेहीजणांच्या भेटीसाठी हा कार्यक्रम आयोजित केला जातो. हिंदू धर्मीयांचा सर्वात मोठा व पवित्र सण म्हणून दिवाळीची ओळख असली तरी या सणाने जाती - धर्माच्या भिंती केव्हाच ओलांडल्या आहेत. सर्वांच्या मनाला आनंद देणारा हा सण आपल्या जिव्हाळ्याचा माणसांसोबत साजरा व्हावा, या संकल्पनेतून मागील अनेक वर्षापासून देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने दीपावली स्नेह मिलन व दीपावली फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

सध्या शेतीतील कामांची लगबग व निवडणुकीची धामधूम सुरु असूनही शेतकरी बांधव, विधानसभा निवडणुकीतील प्रमुख उमेदवार, पदाधिकारी, सरपंच, नगरसेवक, पं.स. सदस्य, जि.प. सदस्य, पत्रकार, आजी माजी आमदार आदी लोकप्रतिनिधी आवर्जून उपस्थित होते. डॉ.शेटे यांच्यावर प्रेम करणारे माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्तेही या प्रसंगी उपस्थित होते. सकाळी १० वाजता सुरू झालेला हा स्नेह मिलनाचा सोहळा सायंकाळी ८ वाजे पर्यंत सुरूच होता. देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी उत्कृष्ठ नियोजन केले होते.

सामाजिकच नाही तर राजकीय सलोखा

डॉ.ओमप्रकाश शेटे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. जात, धर्म, पक्ष - पंथ याच्या पलीकडे जाऊन 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' समजून काम करताना त्यांनी जपलेला सामाजिक सलोखा व बंधुभाव सर्वश्रुत आहे. मात्र आज त्यांच्या कार्यक्रमात विधानसभा निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभा असलेले सर्व प्रमुख उमेदवार उपस्थित राहिल्याने शेटे यांनी राजकीय सलोखा सुद्धा निर्माण केला आहे अशा प्रतिक्रिया जाणकारांनी व्यक्त केल्या.

# दिव्यांग मतदार जनजागृती रॅली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जिल्हा समाज कल्याण कार्यालय , डथ-झ तसेच दिव्यांग मतदार जनजागृती कक्ष अंबाजोगाई च्या वतीने सोमवार दि.११ रोजी शहरातून दिव्यांग मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते . या रॅलीस दिव्यांग मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद असा मिळाला.सदरील रॅली ही गटशिक्षण अधिकारी कार्यालयातुन निघून पुन्हा अंबाजोगाई शहर व परिसरात काढण्यात आली.या रॅलीस गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे



विस्तार अधिकारी सुवर्णकार सर, दिव्यांग मतदार कक्ष आंबाजोगाई तालुक्याचे नोडल अधिकारी आप्पासाहेब चव्हाण तसेच दिव्यांग कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी लांडे सर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखऊन उद्धाटन करण्यात आले.या रॅलीचे मार्गक्रमण गटशिक्षण अधीकारी कार्यालयापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक मार्गे तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. या रॅलीस दिव्यांग बांधव तसेच अंबाजोगाई शहरातील सर्व दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक , शिक्षक व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. दिव्यांगांचे १००% मतदान होण्याच्या दृष्टीने रॅलीमध्ये प्रबोधन होण्यासाठीचे फलक रॅलीमध्ये झळकत होते.

दिव्यांग मतदार जन जागृती रॅलीचा समारोप तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे करण्यात आला. समारोप प्रसंगी तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर सर्व दिव्यांग शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# अंबाजोगाईच्या हर्षवर्धन विजय शिंदे याची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अंबाजोगाई – प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे आणि जिल्हा क्रिडा परिषद व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय वर्धा द्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या हर्षवर्धन विजय शिंदे याची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे.



वर्धा येथील हिंगणघाट येथे ६ नोव्हेंबर पासून राज्यस्तरीय स्पर्धा सुरु झाल्या होत्या या स्पर्धेत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर विभागातून क्रिकेट खेळाडू आले होते. या स्पर्धेत हर्षवर्धन विजय शिंदे याने उत्तम गोलंदाजी करून स्पर्धेत आपली छाप निर्माण केली. या कामगिरीच्या जोरावर हर्षवर्धन विजय शिंदेची महाराष्ट्र १४ वर्ष आतील संघात निवड झाली.

हर्षवर्धन हा पोदार इंटर नॅशनल स्कूलमध्ये आठवी वर्गात शिक्षण घेत आहे.

हर्षवर्धन ला प्रशिक्षक स्वप्नील कोकाटे, शुभम बिडगर, समाधान ओव्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले आहे त्याच्या यशाबद्दल तालुका समन्वयक दत्ता देवकते जोधळे सर, सचिन मसलेकर, राजकुमार मसने तसेच पोदार इंटर नॅशनल स्कूलचे प्रा. कीर्तिकुमार देशमुख, प्रताप रसाळ, मुखीद शेख यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# माजलगाव विधानसभा मतदारसंघात २०१ दिव्यांग व वृध्द मतदार घरीच बजावणार मतदानाचा हक्क

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघात २०१ वृध्दमतदार व दिव्यांग मतदार घरी मतदानाचा हक्क बजावणार असुन आठ पथके नेमुन हि मतदान प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. निवडणूक यंत्रणा नियोजीत पध्दतीने या मतदाराला मतदानाचा हक्क देत आहे.



माजलगाव विधानसभा मतदारसंघात माजलगाव, वडवणी, व धारूर तालूक्याचा समावेश असुन ८५ वर्षा पेक्षा जास्त वय असणारे मतदार व दिव्यांग मतदार यांना घरी मतदानाचा हक्क बजावता येणार असुन माजलगाव मतदारसंघात तिन तालूक्यात ८५ वर्षा वया वरील १९३ तर दिव्याग़ ८ असे एकून २०१ मतदारानी गृह मतदाना साठी नोंद केली. असुन निवडणूक विभागानने आठ पथके नियुक्त करून या मतदाराचे मतदान प्रक्रीया सुरू केली असून कुठलाच मतदार मतदाना पासून वंचित राहणार नाही प्रत्येक मतदाराला मतदानाचा हक्क बजावण्यास मिळावा या साठी प्रशासकीय यंत्रणा काम करत आहे. आठ टथके या वृध्द व दिव्यांग मतदाराचे घरी जाऊन मतदानाचा हक्क बजावून घेत आहेत. हि मतदान प्रक्रीया व्यवस्थीत पार पाडण्या साठी निवडणुक अधिकारी तथा उपजिल्हाधधीकारी गौरव ईंगोले. या विभागातील नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, सुनिल ढाकणे, धारूर नगर परीषदेचे मुख्याधीकारी महेश गायकवाड ईतर कर्मचारी व आठ पथके परीश्रम घेत आहेत

# विज जोडणी देण्यास अडवणूक केली; महावितरण कंपनीस १० हजारांचा दंड

**बीड । प्रतिनिधी**

ओमर टॉवर अपार्टमेंट, जम जम कॉलोनी बीड येथील रहिवाशी श्रीमती गोहर यांनी नवीन विज जोडणी साठी महावितरण कंपनीस रीतसर अर्ज सादर केला होता. महावितरणचा भोंगळ व भ्रष्ट कारभार तसेच अधिकारी अभियंत्याची मुजोरी यामुळे त्यांना वीज जोडणी देण्यास टाळाटाळ केली जात होती. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनेक विनंत्या व तक्रार अर्ज करून देखील विज जोडणी मिळत नसल्याने सदर ग्राहकाने ॲड. नईम कुरेशी यांच्या मार्फत बीड येथील जिल्हा तक्रार निवारण न्यायालयात धाव घेतली. या अपार्टमेंट मधील इतर रहिवाश्यांना देखील विज जोडणी दिली जात नव्हती. त्यामुळे या अपार्टमेंट मधील अणेक रहिवाश्यांना नाविलाजाने लपून छपून व जास्तीचे पैसे मोजून इतर रहिवाश्यांच्या घरातून विज घ्यावी लागत होती.



ॲड.नईम कुरेशी

रस्त्यांवरील अतिक्रमीत जागेवर, असुरक्षित व जीवित हानीस कारणीभूत ठरणाऱ्या ठिकाणी, बेकायदेशीर विज जोडणी देणारे, आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्याकडे डोळेझाक करणारे महावितरण चे अधिकारी, या अपार्टमेंट मध्ये मात्र कर्ज काढून सदनिका खरेदी करणाऱ्या सामान्य नागरिकांना कायदेशीर मागणी करूनही विज जोडणी देण्यास मुद्दाम टाळाटाळ करीत होते. सदर अपार्टमेंटचा बिल्डर ओमर मुस्ताक फारोकी याच्या थकबाकीचे कारण पुढे करून येथील रहिवाश्यांच्या सदनिकेस विज जोडणी देण्यात येत नव्हती.

विज ही अत्यावश्यक गरज असून, जीवन जगण्याचा मुलभूत अधिकारात त्याची गणना होते. ग्राहकास विज जोडणी नाकारण्याची महावितरणची कृती बेकायदेशीर व घटनाविरोधी असल्याचा युक्तीवाद ॲड. नईम कुरेशी यांनी केला. तसेच बिल्डरच्या थकबाकी साठी या ग्राहकास जबाबदार ठरविण्याची महावितरणची कृती बेकायदेशीर असल्याचे त्यानी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

दोनीही बाजूंचे पुरावे व युक्तीवाद ऐकून जिल्हा ग्राहक मंच न्यायालयाने ग्राहकास त्वरित विज जोडणी देण्याचे महावितरण कंपनीस आदेशित केले. तसेच वीज जोडणीची मागणी करूनही ती देण्यास टाळाटाळ केल्याने तक्रारदारास झालेल्या मानसिक त्रासाची भरपाई म्हणून महावितरण कंपनीने संबंधित ग्राहकास रु. १० हजार नुकसान भरपाई देण्याचे व वीज जोडणी देण्यास दिरंगाई झाल्यास ५० रु प्रती दिवस दंड देण्याचे देखील महावितरण कंपनीस आदेशित केले.

ग्राहक तक्रार निवारण न्यायालयाच्या या आदेशाने सर्व जनतेत समाधान व्यक्त केले जात असून या निर्णयामुळे महावितरण च्या मनमानी कारभारास लगाम बसेल अशी चर्चा समाज वर्तुळात होत आहे.

पान ६ वरून...

## सुरेश धस यांच्या

सुरू ठेवले आहे गेल्या दोन वर्षांपूर्वी आष्टी मतदार संघामध्ये बिबट्याने कहर केला होता त्यावेळी रात्री अपरात्री ही दस हे नागरिकांच्या मदतीला धावून येत होते तसेच कोरोना काळामध्ये स्वतःचा व कुटुंबाचा जीव धोक्यात घालूनही त्यांनी हजारो रुग्णांना जीवदान देण्याचे काम केले त्यावेळी विरोधक मात्र घरामध्ये बसले होते हे वास्तव ना करून चालणार नाही आता आष्टी पाटोदा विधानसभा मतदारसंघाची रणधुमाळी जोरात सुरू असून दररोज शेकडो तरुणांचा धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश होत आहे

## लोकांसाठी मी कायम संघर्ष करत

उभा राहिलो. कोरोना सारख्या कठीण काळात आपण लोकांना धीर दिला त्यामुळे आज लोका आपल्या भोवती आहेत. विरोधक आज संभ्रम निर्माण करतील. आपल्या भावनाना हात घालतील. भुलथापा मारतील. अशा परिस्थितीमध्ये आपल्या कामाचा माणूस कोण याचा विचार करून गेवराई तालुक्याच्या उद्याच्या भवितव्यासाठी महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन विक्रमी मतांनी विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.अमरसिंह पंडित यांनी चकलांबा सर्कलचा झंझावाती प्रचार दौरा केला ठिकठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. त्यांच्या कॉर्नर बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी मतदारांनी विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचा निर्धार बोलून दाखवला.

cmyk

# हिवाळ्यात जनावरांची 'अशी' घ्या काळजी

**हिवाळा हा ऋतू पशुधनासाठी आरोग्यदायी असला तरी सध्या राज्यात दिवसा ऊन आणि रात्रीच्या वेळी थंडी असे विषम वातावरण आहे. लहान करडे, कोकरे, वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेल्या जनावरांची काळजी घेणे गरजेचे आहे.**

**हिवाळ्यात जनावरांची काळजी**


जनावरांच्या गोठ्यांना बारदान किंवा शेडनेटचे पडदे लावावेत. गोठ्यामध्ये उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० वॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावेत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोट्या जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी, यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा.

थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषतः: गाभण गायी म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त उर्जा मिळवण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड, सरकी पेंड यांचा



वापर करावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनेयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरायला नेताना सकाळी उशिरा न्यावे जेणेकरून गवतावर दव नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चारावयास नेऊ नयेत. सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टर्पेन्टाइनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट, पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अति थंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या खुरकुत आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे.

# शेती आणि पशुपालनासाठी रोबोट्स करतात श्रम आणि वेळेची बचत!



**शेतीमध्ये आधुनिक उपकरणे आणि कृषी यंत्रांचा वापर वाढत आहे. याच्या वापराने एकीकडे देशातील पिकांचे उत्पादन वाढले तर दुसरीकडे शेतकऱ्यांचे श्रम व वेळ वाचला. आता शेतीतही ड्रोनचा वापर वाढू लागला आहे. परदेशात शेतीच्या कामासाठी रोबोटचा वापर केला जात आहे. आपल्या देशातही काही ठिकाणी रोबोचा वापर शेतीत होताना दिसत आहे. विशेषत: ज्या ठिकाणी मनुष्य पोहचू शकत नाही अशा ठिकाणी रोबोचा वापर करून शेतीचे काम सोपे केले जात आहे. भविष्यातील शेतीसाठी रोबोट हा एक उत्तम कृषी यंत्र पर्याय असू शकतो.**

**कोणत्या कृषी कार्यासाठी रोबोटचा वापर :**

**मातीच्या नमुन्यासाठी स्मार्टकोर रोबोट :**

जर तुम्हाला तुमच्या शेतातील मातीचे नमुने घेण्याचे काम रोबोटच्या साहाय्याने करायचे असेल तर तुम्ही यासाठी स्मार्टकोर नावाचा रोबोट वापरू शकता. हा रोबोट आपोआप मातीचे नमुने घेतो.

**बियाणे पेरणीसाठी रोबोट :**

बियाणांची पेरणीही आता रोबोटद्वारे करता येणार आहे. यासाठी भारतीय कृषी संशोधन संस्थेने एक रोबोट तयार केला आहे जो कमी वेळेत शेतात बियाणे पेरण्याचे काम सहज करू शकतो.

**तण काढण्याच्या कामासाठी इव्हो रोबोट :**

शेतात तण काढण्याचे कामही रोबोटद्वारे करता येते. यासाठी इव्हो नावाचा रोबोट तयार करण्यात आला आहे. हे शेतातील तण कमी वेळेत आणि मुळांच्या पिकाला इजा न करता काढण्याचे काम करते.

**द्राक्ष छाटणीसाठी रोबोट :**

रोबोट द्राक्षबागांमध्ये छाटणीच्या कामासाठी तयार करण्यात आला आहे. या रोबोटच्या माध्यमातून खराब द्राक्षे वेगळी करता येतात.

**झाडे लावण्यासाठी ट्री रोव्हर रोबोट :**

झाडे न कापता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लावण्याच्या कामासाठी रोबोटही तयार करण्यात आला आहे. या रोबोटच्या मदतीने तुम्ही कोणतेही झाड न कापता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लावू शकता. ट्री रोव्हर असे या रोबोटचे नाव असून तो झाडाला इजा न करता दुसऱ्या ठिकाणी लावण्याचे काम करतो.

**पिकांच्या कापणीसाठी ऑक्टेनॉन रोबोट ३**

पीक कापणीसाठी एक रोबोट देखील तयार करण्यात आला आहे, ज्याचे नाव ऑक्टेनियम रोबोट आहे. विशेषत: स्ट्रॉबेरी तोडण्यासाठी या रोबोटचा वापर केला जात आहे.

**पोल्ट्री फार्मची काळजी घेणारा रोबोट :**

शेतीसोबतच यंत्रमानव पशुपालनाच्या क्षेत्रातही उतरले आहेत. पोल्ट्री फार्ममधील पोल्ट्रीची काळजी घेण्यासाठी स्वॅगबॉट नावाचा रोबोट तयार करण्यात आला आहे. हा रोबो पोल्ट्री फार्मवर लक्ष ठेवण्याचे काम करतो, तो कोंबड्याही मोजू शकतो.

**शेतीमध्ये रोबोट वापरण्याचे फायदे :**

परदेशात रोबो वापरून शेतीची कामे केली जात आहेत. यंत्रमानवांच्या शेतीमध्ये अनेक फायदे दिसून येत आहेत. हाताने काढणीला जास्त वेळ लागतो तर रोबोट फार कमी वेळेत कापणीचे काम करू शकतात. रोबोच्या मदतीने पीक कापणी अचूकपणे करता येते. रोबोच्या साहाय्याने कीटकनाशके किंवा तणनाशकांची फवारणी केल्याने कोणतेही नुकसान होण्याची भीती नाही, तर शेतकऱ्याने कीटकनाशकांची फवारणी केल्यास अपघात होण्याची भीती आहे. शेतकरी रोबोच्या मदतीने तण काढण्याचे काम करू शकतात. यासाठी अशी रोबोटिक यंत्रे येत आहेत जी निवडक तण काढण्याचे काम करतात.

**शेतीत रोबोट्स वापरातील त्रुटी :**

यंत्रमानवांचा शेतीमध्ये वापर करण्यातील सर्वात मोठा दोष म्हणजे हे रोबो खूप महाग आहेत आणि प्रत्येक शेतकऱ्याला ते विकत घेणे परवडत नाही.



# रब्बी हंगामातील चारापिके लागवडीचे तंत्र

**चारा उत्पादनासाठी उपलब्ध क्षेत्र व बारमाही पाणी असेल तर त्याप्रमाणात हंगामानुसार व गरजेनुसार पिके घेता येतात. उन्हाळी व खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, मका व संकरित नेपिअर या पिकांचा समावेश करावा. रब्बी हंगामात मका, ओट व ज्वारी या पिकांचे पेरणी करावी. आज आपण रब्बी हंगामातील ज्वारी, मका व ओट या पिकांच्या पेरणीची तंत्रशुध्द माहिती जाणून घेणार आहोत.**

ज्वारी : रब्बी हंगामात सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात पेरणी करावी. पेरणीसाठी रुचिरा, फुले गोधन, फुले अमृता, मालदांडी ३५-१, या जातींची ३० सें.मी. अंतरावर पाभरीने पेरणी करावी. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझेटोबॅक्टर हे जिवाणू संवर्धक चोळावे. पेरणीसाठी हेक्टरी ४० किलो बियाणे लागते. हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे त्यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरित ५० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे. मका : पेरणीसाठी आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, गंगा सफेद-२, विजय या जातींची निवड करावी. पेरणीसाठी हेक्टरी ७५ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाणास २५० ग्रॅम अॅझेटोबॅक्टर या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. ऑक्टोबर- नोव्हेंबर महिन्यात पाभरीने ३० सें.मी. अंतरावर पेरणी करावी. प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरित ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता पेरणीनंतर एक महिन्याने द्यावा. ओट : साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात दोन ओळीत ३० सें.मी. अंतर ठेवून पाभरीने पेरणी करावी. पेरणीसाठी फुले हरिता (बहु कापणीसाठी), फुले सुरभी किंवा केंट (एक कापणीसाठी) या सुधारीत जातींचे हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझेटोबॅक्टर या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. ओट या चारा पिकासाठी हेक्टरी १२० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे यापैकी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४०किलो पालाश पेरणीच्या वेळी, तर उर्वरित ४० किलो नत्र पेरणीनंतर २५ दिवसांनी व ४० किलो नत्र पहिल्या कापणीनंतर प्रति हेक्टरी द्यावे.

# रब्बीतील जवस लागवड तंत्रज्ञान

**महाराष्ट्र राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा विभागात जवस हे पीक रब्बी हंगामात घेतले जाते. जवसाच्या ८० टक्के उत्पादनाचा तेल काढण्याकरिता व २० टक्के धागा काढण्याकरिता उपयोग केला जातो. जवसाच्या अधिक उत्पादनासाठी शुद्ध व जातिवंत बियाणे असणे गरजेचे असते जसे की 'शुद्ध बिजोपोटी फळे रसाळ गोमटी ' ह्या कथना प्रमाणे जातिवंत बी हे फार महत्वाचे आहे. कारण पिकाची वाढ व उत्पादन हे वापरलेल्या बियाणावरच अवलंबून असते म्हणून विविध वाणांचे बीजोत्पादन शास्त्रोक्त पद्धतीने करणे आवश्यक आहे.**



**जमीन** : जवस हे पीक मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, उत्तम निचऱ्याची, आम्ल-विम्ल निर्देशांक ५ ते ७ दरम्यान असणार्या जमिनीत लागवडीस उत्तम असते.

**हवामान** : जवस हे पिक मुख्यत्वे रब्बी हंगामातील असून या पिकाच्या वाढीसाठी २० ते ३० अंश से तापमान आवश्यक असते. या पिकास फुलोरा व त्यानंतरच्या अवस्थेत जास्त कोरडे व उच्च तापमान (३२ अंश ) असल्यास उत्पादनामध्ये लक्षणीय घट संभवते.

**पूर्वमशागत** : प्रथम जमिनीची खोल नांगरट करून एक कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर काडीकचरा वेचून घेऊन शेवटच्या वखरणीपूर्वी हेक्टरी १० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरुन मिसळावे.

**पेरणीची वेळ** : जवसाची पेरणी ऑक्टोबरच्या दुसर्या व तिसर्या आठवड्यात करावी आणि दोन ओळींतील ३० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी ५ ते ७ सेंमी पेक्षा अधिक खोल करू नये.

**बियाणाचे प्रमाण** : जवस पिकाचें भरपूर बीजोत्पादन मिळण्यासाठी प्रति हेक्टरी ४.५ ते ५ लाख रोपांची संख्या असणे आवश्यक आहे. त्यासाठी शिफारस केलेले शुद्ध प्रमाणित, टपोरे व निरोगी बियाणे प्रति हेक्टरी १२ ते १५ किलो वापरावे.

**बीजप्रक्रिया** : पेरणीपूर्वी प्रति किलो बियाणास कार्बेन्डेंझिम १.५ ग्रॅम किंवा थायरम ३ ते ३.५ ग्रॅम लावावे.

**खत व्यवस्थापन** : रासायनिक तसेच सेंद्रिय खते जवसाच्या उत्पादनवाढीस महत्वाचे कार्य करीत असतात. कोरडवाहू जवसाकरिता २५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद प्रति हेक्टरी पेरणीच्या वेळेस द्यावे. तसेच बागायती लागवडीसाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे, अर्धा नत्र (३० किलो) + संपुर्ण स्फुरद (३० किलो) पेरणीच्या वेळी द्यावे, तसेच राहिलेल्या अर्ध्या नत्राची मात्रा (३० किलो नत्र) ४० ते ४५ दिवसांनी द्यावी.

**पाणी व्यवस्थापन** : जवस हे पीक पाण्यास उत्तम प्रतीसाद देणारे आहे. या पिकास दोनदा पाणी देणे आवश्यक आहे. पहिले पाणी पीक फुलोर्यात असताना म्हणजेच ४० ते ४५ दिवसांनी आणि दुसरे पाणी ६५ ते ७० दिवसांनी (बोंडें धरण्याच्या वेळेस) द्यावे.

**आंतरमशागत** : जवसाचे पीक पहिल्या ३५ दिवसांपर्यंत तणविरहित ठेवावे. पेरणीनंतर २५ दिवसांनी पहिली डवरणी करावी.

**पीक संरक्षण** : गादमाशी : गादमाशीचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्यात करावी. या माशीच्या नियंत्रणासाठी ३०% प्रवाही डायमेथोएट १० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**भुरी** : या रोगाचा प्रसार हवेद्वारे होतो. या रोगाच्या नियंत्रणाकरिता पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २५ ग्रॅम किंवा कॅराथेन १० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**अल्टार्नेरिया ब्लाइट** : या रोगाचा प्रसार बियाणाद्वारे होतो. या रोगाच्या नियंत्रणासाठी थायरम किंवा कार्बेनडाझिम ३ गॉ्रम प्रति किलो बियाण्यासोबत बीजप्रक्रिया करावी. तसेच या रोगाचे लक्षण दिसताच मॅन्कोझेब २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**मर** : या रोगाचा प्रसार बियाण्याद्यारे होतो. या रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी. तसेच या रोगाच्या नियंत्रणाकरिता ब्रासिकोल किंवा थायरम ३ ग्राम प्रती किलो बियाण्यासोबत बिजप्रक्रिया करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०५ : नॉर्वेच्या जनतेने सार्वमतात प्रजासत्ताक होण्याऐवजी राजसत्ताच कायम ठेवण्याचा कौल दिला.
१९१८ : ऑस्ट्रिया प्रजासत्ताक बनले.
१९२५ : अमेरिका व इटली या दोन देशांनी आजच्याच दिवशी शांतता करारावर स्वाक्षरी केली होती.
१९२७ : सोविएत कम्युनिस्ट पक्षातुन लिऑन ट्रॉटस्कीची हकालपट्टी करण्यात आल्यामुळे जोसेफ स्टॅलिनच्या हातात सर्व सत्ता गेली.
१९३० : पहिल्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९३६ : केरळ येथील मंदिरे सर्व हिंदू धर्मियांकारिता खुले करण्यात आले होते.
१९४५ : पुण्यात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांची राजकीय परिस्थितीवर साडेदहा तास चर्चा झाली.
१९५६ : आजच्याच दिवशी मोरक्को, सुदान आणि ट्युनिशिया हे देश संयुक्त राष्ट्र या जागतिक संघटनेत समाविष्ट झाले होते.
१९५६ : मोरोक्को, सुदान आणि ट्युनिशियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९६७ : आजच्याच दिवशी इंदिरा गांधी यांना पंतप्रधान असतांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले होते.
१९९० : टिम बर्नर्स-ली यांनी वर्ल्ड वाइड वेबसाठी औपचारिक प्रस्ताव प्रकाशित केला.
१९९८ : परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना व्हिसाशिवाय मायदेशी येण्याची सुविधा देणारी 'पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजीन' ओळखपत्र योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहीर केले. १५ सप्टेंबर २००२ पासून या योजनेच्या अंमलबजावणीस प्रत्यक्ष सुरुवात झाली.
२००० : १२ नोव्हेंबर हा दिवस 'राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९४७ मधे याच दिवशी महात्मा गांधी यांचे दिल्ली आकाशवाणीवरुन भाषण प्रसारित झाले होते.
२००० : भारताची वूमन ग्रँडमास्टर विजयालक्ष्मी सुब्रम्हण्यम हिने तुर्कस्तानातील इस्तंबूल येथे झालेल्या ३४ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाडमधे वैयक्तिक रौप्यपदक मिळवले.
२००३ : 'शांघाय ट्रान्सरॅपिड' या प्रवासी रेल्वेने ५०१ किमी/तास या वेगाने जाण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला.
२०१५ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशांत आतंकवादी हल्ल्यात ४३ जन मृत्यमुखी पडले होते ह्या हल्ल्याची जबाबदारी आई एस आई संघटनेने स्वीकारली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : बहाउल्ला - बहाई पंथाचे संस्थापक (मृत्यू: २९ मे १८९२ आक्रा, इस्त्राएल)
१८६६ : चीन प्रजासत्ताक चे पहिले अध्यक्ष सन यट-सेन यांचा जन्म. (मृत्यू: १९२५)
१८८० : पांडुरंग महादेव तथा 'सेनापती' बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६७)
१८८९ : रीडर डायजेस्टचे सहसंस्थापक डेव्हिट वॅलेस यांचा जन्म. (मृत्यू: १९८१)
१८९६ : डॉ. सलीम अली - जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक (मृत्यू: २७ जुलै १९८७)
१९०४ : श्रीधर महादेव तथा एस. एम. जोशी - समाजवादी, कामगार नेते, पत्रकार, संयूक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्वर्यू (मृत्यू: १ एप्रिल १९८९)
१९४० : अमजद खान - हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (मृत्यू: २७ जुलै १९९२ मुंबई).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४६ : पण्डित मदन मोहन मालवीय बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: २५ डिसेंबर १८६१)
१९५९ : केशवराव मारुतराव जेधे - स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक. केशवराव व बाबूराव याबंधूंचा सत्यशोधक चळवळीकडे ओढा होता. त्यांनी 'मजूर' हे वृत्तपत्र काढले. (जन्म: ९ मे १८८६)
१९५९ : सेवानंद गजानन नारायण तथा बाळूकाका कानिटकर - अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८८६)
१९६९ : इस्कंदर मिर्झा - पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती (जन्म: १३ नोव्हेंबर १८९८)
१९९७ : वेदाचार्य विनायकभट्ट घैसास गुरुजी - वेदाध्ययन आणि त्याचा प्रसार यासाठी संपूर्ण आयुष्य वाहिलेले आचारनिष्ठ घनपाठी.
२००५ : प्रा. मधू दंडवते - रेल्वे मंत्री, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, अर्थतज्ज्ञ (जन्म: २१ जानेवारी १९२४)
२००७ : भारतीय क्रिकेटर के. सी. इब्राहिम यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १९१९)
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते रवी चोप्रा यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९४६).

## निर्यातक्षम फळांसाठी महत्त्वाच्या बाबी

पुणे : भारतातील शेतकरी त्यांच्या शेतात नवनवे प्रयोग करुन विक्रमी उत्पादन घेण्यात अग्रेसर असतात. फळांचे उत्पादन घेतांना शेतकर्यांनी काही बाबींकडे लक्ष दिल्यास त्या फळांना परदेशातही मोठी बाजारपेठ उपलब्ध होवू शकते. मुळात फळांची निर्यात करण्यासाठी त्या फळाच्या गुणवत्तेकडे अगदी लागवडीपासून थेट काढणीपर्यंत लक्ष द्यावे लागते. निर्याणक्षम फळांसाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार काही बाबी खूप महत्त्वाच्या असतात. त्या खालील प्रमाणे १) फळे रोग व किडीच्या प्रादुर्भावापासून मुक्त असावी. २) खराब किंवा डाग पडलेली, पिवळी फळे निवडून वेगळी करावीत. ३) फळांची प्रतवारी करूनच निर्यातीसाठी पाठवावीत. ४) फळांच्या पॅकिंगसाठी ज्यूटच्या धाग्यापासून तयार केलेल्या पिशव्यांचा वापर करावा. ५) ज्या त्या देशाच्या मानकाप्रमाणे फळांचा दर्जा असेल तशाच फळांची तोडणी करून, प्रतवारी करावी आणि पॅकिंग साहित्य वापरावे. ६) टिश्यू पेपरचा वापर फळे गुंडाळण्यासाठी करावा जेणे करून बाष्पीभवन कमी करून टिकाऊ कालावधी वाढविण्यासाठी उपयोग होतो. ७) फळे तोडणीच्या वेळी शक्यतो थंड वातावरण असावे. तसेच तापमान ७ ते १० अंश सें.ग्रे. आणि आर्द्रता ९० ते ९५ टक्के असावी. ८) पॅकिंगसाठी टिश्यू पेपरचा वापर करावा त्यानंतर कोरुगेटेड फायबर बोर्ड बॉक्स वापरावेत. ९) निर्यातीवेळी फळे पाठविण्यासाठी फळांवर कीटकनाशकाचा किंवा बुरशीनाशकाचे अवशेष हे एम.आर. लेव्हल पेक्षा जास्त नसावेत. १०) ज्या बुरशीनाशकावर किंवा कीटकनाशकावर भाजीपाला पिकामध्ये वापरण्यास बंदी घातली आहे अशी औषधे फवारणीसाठी वापरू नयेत.

# बदनापुरमध्ये गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या तीन तलवारी जप्त

**जालना । प्रतिनिधी**

गंभीर गुन्हे घडवण्यासाठी बदनापूर येथे पोस्टाच्या पार्सलद्वारे मागविलेल्या ३ तलवारी जप्त करण्यात आले ही धडाकेबाज कारवाई स्थानिक गुन्हे शाखेची पोलीस पथकाने केली .

दि ११ रोजी जालना जिल्हयातील अवैध शस्त्रे बाळगणा–या आरोपीची माहिती घेऊन त्यांचा शोध घेणे कामी विशेष मोहीम राबवणे संदर्भात मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे सुचनेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन जालना जिल्हा हद्दीतील अवैध शस्त्रे बाळगणा–या आरोपीतांची माहिती घेऊन शोध घेत असतांना खब–या



मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, बदनापुर येथील अबुजर सय्यद जबिर रा. बदनापुर याने त्याचे नावावर धारधार तलवारी पोस्टाद्वारे मागिवलेल्या असुन सदर तलवारी डिलीव्हरी घेण्यासाठी दोघेजण एका मोटारसायकलवर येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहिती मिळाल्यावर सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन वरिष्टांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार

बदनापुर शहरातील पोस्ट ऑफिसच्या आवारात सापळा लावुन गुप्त बातमीदारांनी कळविलेल्या वर्णनाचे दोन इसम एका मोटारसायकलवर एक खाकी रंगाचा आयताकृती बॉक्स घेऊन जातांना दिसल्याने सदर इसमांना मोटारसायकलसह ताब्यात घेऊन त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचे नाव अबुजर सय्यद जबिर वय १९ वर्ष , आवेश शबाब कुरेशी वय १९ वर्ष दोघे रा. बाजार गल्ली बदनापुर असे सांगितले त्यांचे ताब्यातील खाकी रंगाच्या आयताकृती पुठ्ठ्याच्या बॉक्स ची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये ९००० रु किंमतीच्या ०३ धारधार तलवारी असा मुद्येमाल मिळुन आला असुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे. नमुद दोन्ही इसमांविरुध्द पोलीस ठाणे बदनापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोलीस अंमलदार, रुस्तुम जैवाळ, भाऊराव गायके, सागर बाविस्कर, सोपान क्षिरसागर, धीरज भोसले, योगेश संहाणे सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

# सुरेश जेथलिया हे पक्षाशी एकनिष्ठ नसल्याने ते जनतेशी एकनिष्ठ कसे राहणार?

जालना । प्रतिनिधी

सुरेश जेथलिया यांनी कॉंग्रेस पक्षाशी गद्दारी करून बंडखोरी केली व अपक्ष म्हणून परतुर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवीत आहे परंतु सुरेश जेथलिया यांनी पक्षाशी गद्दारी केल्यामुळे त्यांच्यावरील आता जनतेचा विश्वास उडाला असे काही तज्ञ नागरिकाकडून बोलल्या जात आहे.

परतुर विधानसभा मतदार संघात मा, आमदार सुरेश कुमार जेथलिया यांच्या राजकियप्रवास पाहयला तर दर पाच दहा वर्षांनी शिव सेना कॉंग्रेस असाच प्रवास असल्याचे दिसत आहे, जेथलिया आपल्या सोयीचे राजकारण करताना दिसत असुण यापुर्वी दोन हजार नऊ मध्ये शिव सेनेशी बंडखोरी करूण अपक्ष निवडनुक लढवली होती त्यानंतर जेथलिया कॉंग्रेस वासी झाले त्यांणी नंतर दोन हजार चौदा आणी दोन हजार एकोनिस मध्ये कॉंग्रेस कडुण



निवडनूक लढवली होती परंतु दोन्ही वेळेस जेथलियाना पराभवाचा सामणा करावा लागला होता, या वेळेस परतुर मंठा नेर सेवलीची जागा महाविकास आघीडीतुण शिव सेना उबाठा गटाला सुटल्याने परत एकदा सूरेश कुमार जेथलिया यांणी कॉंग्रेस पक्षासी बंडखोरी करत अपक्ष निवडनुक लढवत आहेत आता जेथलिया कुठल्या पक्षात जातील असा प्रश्न आता मतदाराना पडला आहे जे पक्षासी एकनिष्ठ राहू शकले नाही ते जनतेशी काय एकनिष्ठ राहीतील असी चर्चा आता मतदार संघात होऊ लागली आहे.

असुण जेथलिया हे एक महत्वकांशी मत आपल्या झोळीत घेण्या नेतृत्व असुण आपल्या सोयीनुसार करिता जेथलिया काय राजकारण करतात त्यांचा आणी करतील सांगता येणार दोन हजार नऊ मध्ये शिव सेनेशी बंडखोरी पक्षाशी एक निष्ठेचा कोसो दूर संबंध नाही असी परिस्थिति केली आता कॉंग्रेस पक्षासी बंडखोरी दिसत नाही पक्षाने उमेदवारी दिली असूण या वेळेस करत अपक्ष निवडनुक लढविणारे तर जेथलिया पक्षात राहतील नसता मतदार सुज्ञ झाला सुरेश कुमार जेथलिया कोण्या एका कार्यकत्याच्या आग्रहा खातरअपक्ष असूण जेथलियाच्या पक्षासी एकनिष्ठ राहू शकत नाही निवडनूक लढवित असल्याचे भावनिक कॉर्डला ते जनतेशी काय एकनिष्ठ कसे राहू शकतात असे बोलल्या जात आहे . असं चित्र परतुर मतदार संघात दिसून येत आहे.

## निवडणूक कर्तव्यात कसूर; पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक काळात सतर्कता बाळगली जात असताना चेक पोस्टवर नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने कामात दांडी मारल्याच्या कारणावरून नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मांजरसुंबा रोडवरील रत्नागिरी फाट्यावर वाहनांची तपासणी करण्यासाठी चेक पोस्ट उभारण्यात आला आहे या ठिकाणी पोलीस अंमलदार सुदाम सुखदेव शेलार यांची नियुक्ती करण्यात आली होती. अंमलदारांना या ठिकाणी बारा तासांची ड्युटी देण्यात आलेली आहे. मात्र ९ नोव्हेंबर रोजी सुदाम शेलार हे गैरहजर राहिले. ते कर्तव्यावर हजर झाले नाही म्हणून त्यांना मोबाईल वरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. शेवटी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या आदेशावरून सहशिक्षक अण्णा कसबे यांच्या फिर्यादीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात सुदाम शेलार यांच्या विरोधात कलम १३४ लोकप्रतिनिधीत्व कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रामनगर येथील साखर कारखाना कधी सुरू होणार–कैलास गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी**

रामनगर येथे साखर कारखाना सुरू करू असे म्हणणाऱ्यांनी साखर कारखाना कधी सुरू करणार असा प्रश्न आज विचारल्या जात आहे. शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना त केलेल्या कोटयावधी रुपयांच्या भ्रष्ट कारभारामुळेच मा. राज्यमंत्र्यांना ईडीच्या कारवाईला सामोरे जावे लागले असून हे आपण केलेल्या कर्माचे फळ असल्याची टीका इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

जालना विधानसभा मतदार संघातील रामनगरसह अन्य गावांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी खा.डॉ. कल्याण काळे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, मुरलीधर थेटे, शिवाजीराव शेजुळ, राजेंद्र राख, विजय चौधरी, हरिहर शिंदे, गोपाल मोरे, राम शेजुळ, विष्णू पडूळ, दामोधर सोनवणे, युवराज राठोड, संदीप खरात, ज्ञानेश्वर डुकरे, अंजेभाऊ चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना गोरंटयाल म्हणाले की, आपण मागील पाच वर्षात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आणले नाही तर ते कार्यान्वित देखील करून दाखवले. आज या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले असून भविष्यात जालना जिल्ह्यातील स्थानिक विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितपणे लाभ होणार आहे. रस्ते, सामाजिक सभागृह, गाव अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासह अनेक गावातील विकासाची कामे पूर्ण केली असून त्यामुळेच आपल्या मागे जनतेचे पाठबळ मिळत आहे. कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबत आता उध्दव ठाकरे यांची शिवसेना सोबत असल्याने ग्रामीण भागात देखील आपल्याला भरीव मतदान मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करून गोरंटयाल यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार खोतकरांवर टीकेची तोफ डागली. ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आणि सभासदांच्या मालकीचा असलेला कोटयावधी रुपये किमतीचा जालना साखर कारखाना अधिकाऱ्यांना हाताशी धरून कवडीमोल भावात घेतला. या कारणांमुळेच त्यांच्यामागे ईडीच्या कारवाईचा ससेमिरा लागला आहे. चार वर्षांपूर्वी दीपावली पाडव्याच्या दिवशी जालना साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन रामनगर परिसरातील शेतकऱ्यांना दिले होते. काय झाले त्या आश्वासनाचे ? सुरू झाला का कारखाना असा प्रश्न गोरंटयाल यांनी उपस्थितांना विचारत कारखाना तर काही सुरू झाला नाही मात्र, त्यातील किमती असलेले साहित्य लांबवन्यात आल्याचे निदर्शनास आले. नेहमीच आपले कुटुंब आणि काही मोजक्या नातेवाईकांच्या विकासाला प्राधान्य दिले असून पदाधिकारी, कार्यकर्त्यांना त्यांनी कधीही मोठे होऊ दिले नाही. दुसरीकडे आपण मात्र, मागील पाच वर्षात केवळ विकासाला प्राधान्य दिले असून भविष्यात आपल्याला मतदार संघाचे चित्र बदलायचे आहे. त्यामुळे यावेळी पुन्हा एकदा आपल्या पाठीशी उभे राहून भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन शेवटी उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी केले. तत्पूर्वी खा. डॉ. कल्याण काळे यांनी आपल्या भाषणातून राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचे सांगून जालन्याचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांना यावेळी मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याने त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करून पुन्हा एकदा विधानसभेत पाठवा असे आवाहन खा. काळे यांनी केले. या सभेस रामनगरसह परिसरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते हजारो शेतकरी, कामगार आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# समस्या मांडताच सोमेश्वर कदम यांनी रस्त्याचा प्रश्न लावला तात्काळ मार्गी



**बीड । प्रतिनिधी**

मुलभुत समस्यांच्या प्रश्नांनी तस्त्र असणारा मोहम्मदीया कॉलनी परिसरातील नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तरुण तडफदार बीड विधानसभेचे उमेदवार सोमेश्वर राजकुमार कदम यांनी रस्ताच्या गंभीर प्रश्न सांगताच सोमेश्वर राजकुमार कदम यांनी रस्त्याची दुरावस्था पाहून तात्काळ नागरिकांसमोर फोन करून मुरूम पाठवून त्या परिसरातील नागरिकांच्या रस्त्याचा प्रश्न सोडवला व रस्ताच्या समस्यापासून मुक्त केले आणी यापुढेही आपण असेच तेथील नागरिकांच्या मूलभूत गरजा सोडवण्यासाठी सदैव तत्पर असेल विश्वास व्यक्त केला.

मोहम्मदीया कॉलनी व परिसरातील नागरिकांनी यावेळी इतक्या कमी वेळेमध्ये समस्यांचे निवारण केल्याबद्दल मनसे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार सोमेश्वर राजकुमार कदम यांचा भव्य सत्कार करून येणाऱ्या विधानसभा निवडणूकीमध्ये मनसे रेल्वे इंजिनाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी मनसे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे,शहराध्यक्ष करण लोंढे, बीड तालुका सचिव ज्ञानेश्वर कुलकर्णी, बीड शहर संघटक अमर जान पठाण,कार्यक्रमाचे आयोजक समीर शेख,इम्रान खान इ. उपस्थिती होते.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाकडे शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष तर निवडणुकीच्या धामधुमीत पुढाऱ्यांना विसर –ढवळे

बीड । प्रतिनिधी

सध्याच्या विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाची आर्थिक मदत मिळण्यास विलंब होत आहे . शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी त्या कायमस्वरूपी नसल्याने शेतकरी आत्महत्या रोखण्यात अपयश येत आहे.याचवेळी शासन, नेते आणि अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे.ऐरवी भाषणात शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा आव आणणारे लोकप्रतिनिधीं याबाबत मुग गिळुन गप्प असल्याने याबद्दल तिव्र नाराजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश



ढवळे लिंबा गणेश कर यांनी व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ आक्टोबर पर्यंत या १० महिन्यात नापिकी , कर्जबाजारीपणा, अतिवृष्टीमुळे आर्थिक नुकसान या गोष्टींमुळे तब्बल १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद असुन केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपयांची मदत मिळाली असुन उर्वरित कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत.याचवेळी निवडणूकीचे कामकाज असल्याचे कारण देऊन शासन आणि अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे तर नेते मंडळींना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते.

**मराठवाड्यात दहा महिन्यांत ७५७ शेतकरी आत्महत्या**

दुष्काळी पट्टा म्हणून ओळखल्या जाणा–या मराठवाड्यात शेतकरी आत्महत्या सुरूच असुन गेल्या १० महिन्यात शेतकरी आत्महत्यांचा आकडा ७५७ वर पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर बळीराजाला आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. दहा महिन्यांतील जिल्हा निहाय आत्महत्या मध्ये बीड १५१, नांदेड १३५, धाराशिव १३०, छत्रपती संभाजीनगर १२४ , जालना ७०, परभणी ५८,लातुर ६२, हिंगोली २८ अशा एकुण ७५७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. यातील ४४७ प्रकरणात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे तर ५३ प्रकरणे वेगवेगळ्या कारणांमुळे नामंजूर करण्यात आली आहेत.तर २५७ प्रकरणे चौकशी साठी प्रलंबित आहेत.

# आज शेतकरी मित्र राजेंद्र मस्के मित्रमंडळाची बैठक बीड विधानसभेसाठी राजकीय भूमिका करणार जाहीर

बीड । प्रतिनिधी

शेतकरीमित्र राजेंद्र मस्के पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आज सकाळी ११.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे महत्वपूर्ण बैठक आयोजित केली असून, बीड विधानसभेसाठी राजेंद्र मस्के भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती मित्र मंडळाच्या वतीने दिली आहे. माजी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पक्षाला सोडचिट्ठी दिल्यांनतर शरदचंद्र पवार साहेब यांच्या नेतृत्वात मुंबई येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

गेली पाच सात वर्षापासून राजेंद्र मस्के बीड विधानसभेची उमेदवारी



लढवण्याची तयारी करत होते. परंतु बीडची जागा भाजपाला सोडवून घेण्यास पक्ष श्रेष्टीला अपयश आले. बीडची जागा राष्ट्रवादीला सोडण्यात आली. यामुळे राजेंद्र मस्के यांनी पक्षाला सोडचिट्ठी देऊन मराठा आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी करत उमेदवारी अर्जही दाखल केला होता. जरांगे पाटील यांनी निवडणुकीत माघार घेतल्या नंतर त्यांच्या सुचणेप्रमाणे उमेदवारी अर्ज मागे घेतला.

सकल मराठा समाजाच्या वतीने एक उमेदवार देऊन, तो निवडणून आणण्याचा एक विचार समोर आला. यासाठीही राजेंद्र मस्के यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने अद्याप समाजाचा निर्णय होऊ शकला नाही. सकल मराठा समाजाचे धोरण व सामाजिक परिस्थिती लक्षात घेता ते अद्याप बीड विधानसभेच्या रणसंग्रामात उतरले नाहीत. व एक मत होण्याची शक्यताही दिसत नसल्याने आज पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक यांच्याशी संवाद साधून राजकीय भूमिका जाहीर करणार आहेत.

# परळीच्या शिरपेचात मानाचा तुरा

परळी । प्रतिनिधी

शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी भिमाशंकर फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावत परळीचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

शहरातील शास्त्रीनगर भागातील सेवानिवृत्त शिक्षक भिमाशंकर फुटके व आशा फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. डॉ रेणुचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शहरातील न्यु हायस्कूल मध्ये तर उच्च



माध्यमिक शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तर वैद्यकीय शिक्षण मुंबई येथील लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण झाले. यानंतर डॉ रेणुकाने मुंबई येथे प्रॅक्टीस करत २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए ची परिक्षा दिली होती. यापरिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**भिमाशंकर फुटके यांच्या चारही मुली उच्च शिक्षीत**

श्री. फुटके यांनी आपल्या चारही मुलींना उच्चशिक्षण दिले आहे. सोनम शिक्षीका, मिनाक्षी आयआयटी मधून पिएचडीकरुन बेंगलोर येथे नौकरी करत आहे, मेघा कॅनरा बँकेत शाखाधिकारी, डॉ. रेणूका एमबीबीएस डॉक्टर नंतर आता मेडिकल ऑफीसर बनली आहे.

# आनंदऋषीजी डायग्रोस्टिक सेंटरमध्ये गुरुवारी कॅन्सर तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे गुरुवार १४ नोव्हेंबर रोजी ११ ते २ या वेळेत कॅन्सर तपासणी शिबिर. तोंडाचा । स्तनाचा । फुफ्फुसाचा । आतड्याचा लिव्हरचा । स्वादुपिंड । गर्भाशय इ.तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी कॅन्सर असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

घशाचा, फुफ्फुसाचा, आतड्याचा, तोंडाचा इ. कॅन्सर तपासणी शिबीर स्त्रियांचे कॅन्सर तपासणी शिबीर मॅमोग्राफी मशिनद्वारे स्त्रियांच्या स्तनाचा कॅन्सर तपासणी शिबीर शिबीराचे वैशिष्ट्ये स्त्रियांच्या गर्भपिशवीच्या कॅन्सर व निदानाकरिता सवलतीच्या पॅपस्मीयर तपासणी. सर्व प्रकारचे कॅन्सर उपचार, ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटीव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटीक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ. सुविधा अत्यल्प दरात आनंदऋषी हॉस्पिटल अहमदनगर येथे उपलब्ध.

–

महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात डॉ. अनिकेत शिंदे , , कॅन्सर सर्जन व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो कॅन्सर असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. कॅन्सर शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.गुरुवार दि १४ नोव्हेंबर रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ अनिकेत शिंदे , , कॅन्सर सर्जन व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील कॅन्सर रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड शहरातील सर्व सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.हे शिबीर

जैन सोशल फेडरेशन संचलित

* आनंदऋषिजी डायग्नोस्टिक सेंटर

छत्रपती शाहु बँकेजवळ, ओस्तवाल हॉस्पिटलमागे, जालना रोड, बीड येथे होणार असून यासाठी

नाव नोंदणी करणे आवश्यक असल्याचे गौतम खटोड यांनी म्हटले आहे.या साठी ८२६२००९०९१या संपर्क नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन खटोड यांनी केले आहे.

# तरुणाई म्हणते आमचं फिक्स झालंय 'घरचा माणूस हक्काचा माणूस' आता अण्णांच आमदार

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीला आता रंगत आली असून उमेदवारांच्या गाव भेटी दौऱ्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे व मित्र पक्षाचे उमेदवार सुरेश धस यांनी प्रचारात चांगलीच मुसंडी मारली असून गावातील तरुणाई त्यांच्याकडे आकर्षित होत आहे. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून घरोघरी वाडीवस्त्यावर जाऊन तरुणाई प्रचार करत आहे.



आष्टी पाटोदा विधानसभा मतदारसंघांमध्ये सुरेश धस हे काम करण्याची एक वेगळी आमदार म्हणून गेल्या अनेक वर्षापासून परिचित आहेत अगदी तरुणांपासून ते आबाला वृद्धांपर्यंत कोणीही त्यांच्याकडे काम घेऊन गेलेला माणूस कधीही मोकळ्या हाताने परत आला नाही किंवा रात्री अप रात्री कधीही त्यांना संपर्क केला असता ३६५ दिवस २४ तास उपलब्ध असणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते त्यांची काम करण्याची पद्धत यावर असते तालुक्यातील मतदार फिदा झाले असून यावर्षीची निवडणूक निवडणुकीत कसल्याही परिस्थितीत धसांना विजयी करण्यासाठी तरुणांनी विडा उचलला आहे अनेक नवतरुण दररोज वाढीवस्त्यावर जाऊन धसांचे काम व त्यांचे चिन्ह नागरिकांना पर्यंत पोहचत आहेत.आहे सुरेश धस यांनी मागील काळामध्ये कांदा अनुदान यासाठी केलेला लढा असो किंवा दूध अनुदान देण्यास शासनास भाग पाडण्यासाठी केलेले प्रयत्न केलेला असो या दोन्हीही गोष्टींमुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे मध्यंतरी कांद्याचे भाव गडगडले होते त्यावेळी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना कांद्यामध्ये मोठ्या प्रमाणात तोटा निर्माण झाला होता हाच प्रश्न त्यांनी विधान परिषदेमध्ये उपस्थित करून त्यावर आवाज उठवला व सरकारला तीनशे पन्नास रुपये क्विंटल प्रमाणे अनुदान देण्यास भाग पाडले तसेच आष्टी तालुक्यातील प्रमुख व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते आष्टी तालुक्याचे अर्थव्यवस्था ही पूर्णपणे दुधावर अवलंबून असल्याने या ठिकाणी दुग्ध झाल्याशिवाय पर्याय नाही तालुक्यातील तरुणाई दुग्ध व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित झालेली आहे हा व्यवसाय टिकला पाहिजे यासाठी शासनाकडे वेळोवेळी प्रश्न उपस्थित करून सात रुपये लिटरला अनुदान शासनाने दिले आहे याचे श्रेय हे सुरेश धस यांचेच आहे यामुळेच आष्टी तालुक्यातील तरुणाई पुन्हा धसांना विधानसभेत पाठविण्यासाठी सज्ज झाले असून गावोगावी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.



# धनंजय मुंडे यांचा योगायोग पुन्हा एकदा बाबासाहेब काळेंशी आला जुळून

## परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती बाबासाहेब काळे यांचा शरदचंद्र पवार गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश


**परळी । प्रतिनिधी**

धनंजय मुंडे यांचा आणि परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बाबासाहेब काळे यांचा पुन्हा एकदा योगायोग जुळून आला आहे. बाबासाहेब काळे यांनी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देत धनंजय मुंडे यांचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे सिरसाळा आणि परिसरात धनंजय मुंडे यांची ताकत आणखी वाढणार आहे.

बाबासाहेब काळे यांनी माजी आ.आर.टी. जिजा देशमुख, माजी आ.संजय भाऊ दौंड यांच्या प्रमुख उपस्थितीत काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी देखील दूरध्वनीवरून श्री काळे यंच्याशी संवाद साधत त्यांचे स्वागत केले.

यावेळी माजी आ.आर.टी. जिजा देशमुख, माजी आ.संजय भाऊ दौंड, लक्ष्मण तात्या पौळ, राजाभाऊ पौळ, चंद्रकांत कराड, संपत महाराज पुरी, मोहनराव बडे, रवी बडे, रुस्तुम बप्पा सलगर, रमेशराव मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

# एमआयएमचे माजी नगरसेवक शेख शरीफ यांचा धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



**परळी । प्रतिनिधी**

परळीतील एम आय एम चे नेते व माजी नगरसेवक शेख शरीफ यांनी एम आय एम ला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा परळी विधानसभेचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरीफ भाईंचे स्वागत करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शरीफ भाईंची घरवापसी, जोमाने काम करणार

शरीफ भाई हे पूर्वाश्रीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच कार्यकर्ते होते त्यामुळे परत एकदा घर वापसी केल्यामुळे आपण आनंदी असून आता धनंजय मुंडे यांचे निष्ठेने व अधिक जोमाने काम करणारा असून या निवडणुकीत मी व माझ्या सर्व सहकारी तन-मंदनाने धनंजय मुंडे यांच्या पाठीशी राहतील असा शब्द यावेळी शरीफ भाईंनी दिला.

यावेळी शेख शरीफ, वाजेद खान, मुसा भाई, निसार पठाण, पापा ठाकूर, जमील अध्यक्ष, हाजी बाबा, शेख जमिल, युनूस खान, लायक खान यांसह आदी उपस्थित होते.

# केज मतदार संघात नव नवीन डाव, मतदार कोणाला देणार पसंती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीच्या प्रचाराला खऱ्या अर्थाने रंगत येण्यास सुरुवात झाली आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. महाराष्ट्रात होऊ घातलेली विधानसभा निवडणूक अभूतपूर्व आहे. जे राजकारण गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या मैदानावर खेळलं गेलं, त्यानं पूर्वीचे सारे डाव मोडून टाकले. आता नवे डाव पडले आहेत. ते डाव कसे पूर्णत्वाला जातील, याची पूर्वकल्पना कोणीही देऊ शकणार नाही. ते फक्त २३ नोव्हेंबरला निकाल लागल्यावरच समजू शकेल. महाराष्ट्र स्पष्ट निर्णय देईल, की संदिग्धता ठेवून पुन्हा नवं सरकार बसण्याअगोदर अस्थिरता येईल, हेही त्यानंतरच समजेल. तो निर्णय कसाही येवो, पण एक निश्चित आहे की काही नेत्यांची कारकीर्द या निवडणुकीत पणाला लागली आहे. त्यांच्यासाठी ही सर्वस्वाची लढाई बनली आहे. केज मतदार संघाचे बोलायचे झाले नमिता





मुंदडा विरुद्ध पृथ्वीराज साठे होणार असल्याचे चित्र दिसत आहे. तर येथील लढत ही यांच्यामध्येच थेट त्यासाठी दोन्ही उमेदवारांनी आपापल्या परीने जोरदार प्रचार सुरू केला आहे. नमिता मुंदडा यांचा पराभव करण्यासाठी पृथ्वीराज साठे आणि महविकास आघाडीच्या नेत्यांकडून जोरदार प्रयत्न सुरू आहे. पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारासाठी सर्वजण कसून कामाला लागले आहेत केज मतदार संघात ही निवडणूक नमिता मुंदडा व पृथ्वीराज साठे यांच्यामध्येच काटेकी टक्कर सुरू असल्याचे सध्याचे वातावरण दिसत आहे. परंतु जसजशे मतदानाचे दिवस जवळ येतील तसे दोन्ही उमेदवारांकडून नव नवीन डाव टाकले जातील. ते डाव कसे पूर्णत्वाला जातील, व कोण बाजी मरणार याची पूर्वकल्पना कोणीही देऊ शकणार नाही. ते फक्त २३ नोव्हेंबरलाच समजू शकेल. मात्र काहींसाठी ती केवळ निवडणूक अशी न राहता, ती वैयक्तिकही झाली असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येत आहे. शिवाय अनेक जणांसाठी ही निवडणूक एवढं काही पणाला लागलं आहे की जर विजय मिळाला नाही तर पक्ष आणि वैयक्तिक कारकीर्द अवघड वळण घेईल की त्यातून सावरणे त्यांच्यासाठी जिकिरीचे असेल. असे वातावरण निर्माण झाले आहे, किबहुना निर्माण केले आहे. अर्थात, राजकारणात अंतिम काहीही नसतं, काही दारं बंद होतात, तर काही उघडतात. तरीही यंदाची विधानसभा निवडणूक या दोन्ही नेत्यांसाठी निर्णायक आणि काही सिद्ध करुन दाखवणारीआहे

# बागवान समाज डॉ.योगेश क्षीरसागरांना देणार साथ



## बीडमध्ये बैठकीत समाजाने घेतला एकमुखी निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना साथ देण्याचा एकमुखी निर्णय बागवान समाजाने बीड शहरात रविवारी (दि.१०) सायंकाळी झालेल्या बैठकीत घेतला आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरातील बागवान समाजबांधवांशी संवाद साधला. येत्या २० तारखेला अनुक्रमांक ४ समोरील घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा. बीड विधानसभा मतदारसंघाची सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. बागवान समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहे, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. यावेळी बागवान समाज पंच कमेटी अध्यक्ष हाजी हाशम बागवान उपाध्यक्ष हाजी हारून बागवान, टिपू सुलतान युवा मंचाचे अध्यक्ष इरफान बागवान, हाजी मुसा बागवान, हाजी अब्दुल रौफ बागवान, नाहेद बागवान, आयुब बागमार, इंजि.इम्रान बागवान, हाजी जाफर बागवान, सोनू बागवान, फरहान बागवान यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. ज्योतीताई मेटे यांना संधी द्या

## बीड शहरात शिवसंग्राम महिला आघाडी डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रचारासाठी दारोदारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदार संघातील निवडणूक आता चांगलीच रंगली आहे या निवडणुकीत स्व. विनायकराव मेटे यांनी मतदार संघात आजवर केलेल्या सामाजिक आणि विकास कामांच्या बळावर बीड मतदार संघाच्या उमेदवार डॉ. ज्योती ताई मेटे यांचे पारडे जड झालेले पहावयास मिळत आहे. आज बीड शहरात शिवसंग्राम महिला आघाडी डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रचारासाठी दारो दारी फिरून



ज्योती ताई यांच्या विजयासाठी मतदारांना आवाहन केले आहे या वेळी , अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना अस्वच्छता, रस्ते, पाणी या बीड करांच्या अनेक वर्षांपासून च्या समस्या मागील अनेक वर्षापासून सत्ता असूनही विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे महापाप केले असल्याचे मतदारांनी बोलून दाखवल्याने यंदा बीडकर बदल करण्याच्या तयारीत असून स्व विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती ताई मेटे यांना निवडून देण्यासाठी शहरातून मोठ्या प्रमाणात मतदारांनी ज्योती ताईंच्या विजयासाठी कंबर कसली असल्याचे दिसून येत आहे. सत्ताधाऱ्यांनी मागील पन्नास वर्षे बीडचा विकास केला नाही त्या मुळे आता मतदानातून बीड कर आपला रोष व्यक्त करणार असल्याचे दिसून येत आहे. बीड मतदार संघात मागील अनेक वर्षांपासून विकासाचा खेळखंडोबाब करणाऱ्या क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला असून सामान्य घरातील बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या पाठीशी शहर-ग्रामीण भागातील मतदार मोठ्या प्रमाणात असल्याने ज्योती ताई मेटे यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

# सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हजारो तरुणांचा भाजपमध्ये प्रवेश

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी-पाटोदा विधानसभा मतदारसंघाची मतदारसंघातील निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली असून माजी मंत्री सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मतदारसंघातील हजारो तरुण भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत असल्याचे चित्र दिसून येत आहे माजी मंत्री सुरेश धस यांच्यावर व यांनी केलेल्या कामावर तरुणाई फिदा झाली आहे



गेल्या ३० वर्षापासून माजी मंत्री सुरेश धसे जनसेवेमध्ये अविरत सेवा करत असून त्यामुळेच त्यांना तीन वेळा विधानसभेमध्ये जाण्याची संधी मिळाली आहे कोरोनाचा काळ असो बिबट्याचा काळ असो किंवा दवाखान्यातील कोणतेही आपत्ती असो या कामांमध्ये दश यांच्याकडे गेलेला माणूस कधीही रिकाम्या हाताने परत आला नाही प्रत्येकाला मदत करायची आणि जनसेवा करायची हे व्रत सुरेश धस यांनी गेल्या अनेक वर्षापासून अखंडितपणे ◀◀ पान ३ वर

# लोकांसाठी मी कायम संघर्ष करत राहिलो -अमरसिंह

## विजयसिंह पंडितसाठी अमरसिंहांनी कसली कंबर

**गेवराई । प्रतिनिधी**

जेंव्हा जेंव्हा माझ्या लोकांवर वेळ आली त्या त्या वेळेला मी रस्त्यावर आलो, लोकांच्या हितासाठी संघर्ष केला. दुष्काळात जनता होरपळत होती, तेंव्हा सरकार दरबारी भांडून पाणी आणले. हे माझे काम आहे आणि केले. विरोधकांनी काय केले हे त्यांना विचारुन गेल्या दहा वर्षांचा हिशोब मागा आणि मला भविष्यात या तालुक्याचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी संधी द्या. महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना विजयी करुन मला



बळ द्या असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई विधानसभा मतदारसंघातील प्रचारार्थ दौऱ्यात मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी चकलंबा सर्कलचा प्रचार दौरा करून येथील शेळके वस्ती, सोनवणे वस्ती, निंबाळकर वस्ती, बाभुळगाव तांडा व विविध ठिकाणी मतदाराशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, अडचणीच्या काळात जो आपल्या मदतीला येतो तोच आपला खरा नेता. शिवछत्र परिवार लोकांच्या अडचणीच्या काळात कायम लोकांसोबत राहिला. माझ्या तालुक्यातील जो कोणी अडचणीत येईल त्याच्यासाठी मी कायम त्याच्या पाठीशी खंबीरपणे ◀◀ पान ३ वर

# दुसऱ्याने केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचे काम फक्त काँग्रेसवाल्याचा धंदा -अर्जुनराव खोतकर!

**जालना । प्रतिनिधी**

शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यानी धावेडी, सोरटीनगरला भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, त्या आमदाराला फक्त दुसर्यांवर नको ते आरोप करायचे आणि दुसर्याने केलेल्या, आणलेल्या कामाचे श्रेय घ्यायचे एवढेच काम शिल्लक आहे असा धंदा फक्त काँग्रेसवाले करतात.



मतदारांनी आता खोट्या भुलथांपाना बळी न पडता, आपला कोण आणि परका कोण यातला फरक ओळखावा आणि येणार्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटण दाबून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहनही श्री. खोतकर यांनी केले.

याप्रसंगी शिवसेना युवासेना, शिवसैनिक, तसेच भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जेष्ठ मंडळी, महिला भगिनी, ग्रामस्थ, युवा पिढी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी अर्जुनराव खोतकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, काही भामटे हे आम्ही आणलेल्या योजना चोरतात, आणि पुन्हा आपण योजना आणली म्हणून सांगतात. मेडीकल कॉलेस आपण आले मात्र तो भामटा सांगतो आम्ही आणले, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. आपण सत्तेवर आलो तर संपूर्ण कामगार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा आपण आणले मात्र हा भामटा स्वत:ला जलसम्राट म्हणून घेत आहे. पदवी ही लोकांनी द्यायला हवी. स्वत:तर कोणीही जलसम्राट म्हणून मिरवेल, असे सांगून ते म्हणाले की, राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. त्यामुळे देते देशातील पहिले सरकार ठरले आहे. आपले कोणतेही काम असू द्यात ते मार्गी लावण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही शेवटी श्री. खोतकर यांनी दिले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवार म्हणाले 1 लाख मताधिक्यांनी निवडून येणार; आता, युगेंद्र अन् रोहित पवारांचा पलटवार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचं लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा निवडणुकीत कोणत्या पक्षाचा उमेदवर विजयी होणार, यापेक्षा कोण जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण, येथील मतदारसंघात यंदा थेट पवार विरुद्ध पवार असा सामना रंगला आहे. महायुतीकडून उपमुख्यमंत्री अजित पवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. तर, महाविकास आघाडीकडून त्यांचे सख्खे पुतणे असलेल्या युगेंद्र पवार यांचेच त्यांना आव्हान आहे. त्यामुळे, येथील जनता कोणाच्या पाठीशी उभे राहणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. अजित पवार (–क्षळीं ग्रिी) प्रचारासाठी बारामतीत तळ ठोकून आहेत, तर युगेंद्र पवारांसाठी (र्धीसशपवीर ग्रिी)आजोबा शरद पवारांनी बारामतीत ठाण मांडल्याचं दिसून आलं. मात्र, बारामतीकर माझ्याच पाठीशी उभे राहतील, मी १ लाखांपेक्षा जास्त मताधिक्य घेऊन विजयी होईल, असा विश्वास अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे.



विधानसभा निवडणुकीत १७५ हून अधिक जागांवर महायुतीचा विजय होईल आणि बारामती विधानसभा मतदारसंघातून मी लाखांहून अधिक मतांनी जिंकणार, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. आता, अजित पवारांच्या या विश्वासावर आता त्यांचे प्रतिस्पर्धी युगेंद्र पवार आणि पुतण्या रोहित पवार यांनी पलटवार केला आहे. आम्ही सगळेच राजकारणात राहणार आहोत, पण २३ तारखेपर्यंत आपल्याला थांबावं लागेल, असे रोहित पवार यांनी म्हटले. तसेच, आमच्या १६७ ते १८० च्या आसपास जागा येतील, परंतु नरेंद्र मोदी व अमित शाह यांनी सभा घेतल्या तर आणखी २० आमदार वाढतील, असा टोला रोहित पवारांनी भाजपच्या बड्या नेत्यांना लगावला. त्यांच्या तोंडातून महाराष्ट्राबाबत सकारात्मक शब्द जात नाही, हे लोकांना आवडत नाही. जिथे भाषण करता तिथे द्वेष पसरवतात, ही संतांची भूमी आहे, येथील लोकांना आवडत नाही. यंदाच्या निवडणुकीत आम्ही टार्गेट २८८ ठेवले, त्यांनी टार्गेट १७५ ठेवले त्यामुळे १२० च्या आसपास ते कसं तरी पोहोचतील. २३ तारखेला गुलाल हा विकासाकडेच असेल बारामतीत महाविकास आघाडीच निवडून येईल, असे रोहित पवार यांनी म्हटले. तर, युगेंद्र पवार यांनीही २३ तारखेला पाहू, असे म्हटले आहे.

बारामती तालुक्यात चांगला उत्साह आहे, आज रोहित दादांसोबत प्रचार करत आहोत. विकास ही एक व्यक्ती कुठली करत नसते, तो विकासात सर्वांगीण असतो. त्याच्यामध्ये दादांचं, साहेबांचं, ताईंचं रोहित दादांचं या सगळ्यांचे योगदान आहे, असे युगेंद्र पवार यांनी म्हटलं. तसेच, पवार साहेबांसोबत सर्वसामान्य जनता आहे, त्यामुळे विजयाचा विश्वास वाटतो. लोकसभेचे वातावरण टिकून आहे. अजित दादांनी एक लाखांच्या मताधिक्याचं वक्तव्य केलं आहे, तो त्यांचा अधिकार आहे. मात्र, २३ तारखेला कळेल, असा पलटवार युगेंद्र पवार यांनी अजित पवारांच्या विधानावर केलाय.

युगेंद्र माझ्यापेक्षा जास्त शिकला आहे. आमची तालीम एकच आहे, वस्ताद एकच आहे. युगेंद्रला बारामतीमधील अडचणी माहीत आहेत, आता त्या सोडवण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला नेल्याबद्दल एकही भाजप नेता बोलला नाही. अमित शहा यांना एकानेही विचारलं नाही. योगी आले होते. त्यांच्या सभा खूप मोठ्या असतात. खुर्च्या जास्त लावायच्या आणि कमी माणसे येतात. अमित शाह यांनी लोकसभेमध्ये साहेबांना विचारलं होतं, दहा वर्षात तुम्ही काय केलं? लोकसभेला दाखवले की साहेबांनी काय केलं. कोल्हापूरला म्हणाले पुरावे द्या, २३ तारखेला पुरावा भेटेल. राज्यात आपले सरकार येईल, १७० पेक्षा जास्त आमदार आपले निवडून येतील, असा दावा रोहित पवार यांनी केला.

# पुणे जिल्ह्यात सापडले दुर्मिळ 'पाणमांजर'



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील इंदापूर जवळील एका गावात दुर्मिळ युरेशियन ऑटर (पाणमांजर) आढळून आले आहे. हे एका विहिरीत पडले होते. तब्बल सात तासांच्या रेस्क्यू ऑपरेशन नंतर त्याला विहिरीतून बाहेर काढण्यात आले आणि त्याला पुण्यातील रेस्क्यू सेंटर मध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले. त्याच्यावर उपचार करून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहे.

इंदापूर येथील वनविभागातील कर्मचाऱ्यांना निमगाव केतकी गावाजवळील गोतोंडी गावाजवळील विहिरीत पडलेल्या या पाणमांजरा विषयी माहिती मिळाली. कर्मचारी आनंद हुकिरे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि दौंड येथील रेस्क्यू पथकाला पाचारण करण्यात आले. हे पथक आल्यानंतर त्यांनी पाहिले असता या दुर्मिळ प्राण्याच्या दर्शनाने तेही अचंबित झाले. स्थानिक वनरक्षक मिलिंद शिंदे, अनंत हुकिरे, शुभम कडू आणि शुभम धैतोंडे आणि रेस्क्यू टीम सदस्य, नचिकेत अवधानी, प्रशांत कौलकर, डॉ. श्रीकांत देशमुख यांनी परिस्थितीचे आकलन केले आणि त्वरीत बचाव योजना आखली. ऑटो–ट्रॅप पिंजरा वापरून त्याला पकडण्यात आले. हे ऑपरेशन सात तास चालले. त्यानंतर त्याला मध्यरात्री रुग्णवाहिकेतून पुण्यातील वन्यजीव संक्रमण उपचार केंद्रात नेण्यात आले. १९९० मध्ये उजनी पाणलोट क्षेत्रात या पाणमांजराचे अस्तित्त्व नोंदवले होते. त्यानंतर याचे दर्शन कधीच झाले नाही आणि अचानक तो सापडणे हा वन्यजीव अभ्यासकांसाठी मैलाचा दगड ठरला आहे

# पाणि टंचाई बाबत शंकर जगताप यांना साई पर्ल सोसायटीचे निवेदन

**पुणे । प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना पिंपळे सौदागर परिसरातील साई पर्ल सोसायटीच्या रहिवाशांनी प्रचारादरम्यान पाणी टंचाई बाबत निवेदन दिले. सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक डॉ. विलास भाले, श्रीकांत माने, अनिल कुलकर्णी, बाळासाहेब काटे, अरविंद माने, रामकुमार अग्रवाल, बी. बी. जाधव, तानाजी कांबळे, चंद्रकांत पवार, वसंत बिरुड, हिम्मत काटकर, अरुण देशमुख, दिपूसेठ आदिंच्या स्वाक्षरीसह जगताप यांना दिलेल्या निवेदनात पाणीपट्टी व्यतिरिक्त पाण्याच्या टँकरसाठी सोसायटीला दरमहा दहा लाख रुपयांचा भुर्दंड भरावा लागत असल्याचे नमुद करण्यात आले होते. सदरील निवेदनासंदर्भात गांभिर्याने विचार करुन लवकरच पाणी पुरवठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासंबंधी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही जगताप यांनी यावेळी दिली. पिंपळे सौदागरच नव्हे तर संपूर्ण चिंचवड मतदार संघात मुलभूत सोयीसुविधा पुरवण्यासोबतच सर्वांगिण विकास करणार असल्याचे जगताप यांनी यावेळी सांगितले. या भेटी दरम्यान जगताप यांच्यासोबत महायुती घटक पक्षातील राष्ट्रवादीपक्षाचे नाना काटे, गणेश काटे, पिंपरी चिंचवड भाजपा अध्यक्ष शत्रृघ्न काटे, माजी नगरसेविका निर्मलाताई कुटे, संकेत कुटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, डॉ.कुंदाताई भिसे, अनिताताई तापकीर, अरुण चाबुकस्वार, जयनाथ काटे आदि उपस्थित होते.



# उध्दव ठाकरे यांचे सरकार पाडण्याचे पाप भाजपच्या माथी!

**पुणे । प्रतिनिधी**

भाजप खासदार धनंजय महाडीक यांच्या वक्तव्याची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. शासनाच्या लाडकी बहीण योजनेतून दरमहा १,५०० घेणाऱ्या महिला काँग्रेसच्या रॅलीत दिसल्या तर महिलांचे फोटो काढा, असं धनंजय महाडीक म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर आता सुप्रिया सुळे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिला आहे.



सुप्रिया सुळे म्हणाल्या की, २००० कोटी रुपये खर्च करत उध्दव ठाकरे यांचे सरकार पाडण्याचे पाप भाजपने केले आहे. इतकेच नाही तर महिलांना धमकी देण्याची अक्षम्य चूक ही भाजपने केली आहे. महायुतीनेआधी लाडकी बहीण योजना आणली आणि त्यानंतर महिलांना धमक्या द्यायला सुरुवात केली. भाजपचे हे घाणेरडे राजकारण आहे.

आम्हाला संविधान हातात घेतले म्हणून अर्बन नक्सली म्हणतात. तरीही आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान हातात घेणार म्हणजे घेणार माझे आव्हान देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी दिल.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे घेणार्या महिला जर काँग्रेसच्या रॅलीत अथवा सभेत दिसल्या, तर त्यांचे फोटो काढा. नावे लिहून घ्या आणि आमच्याकडे पाठवा. आम्ही त्याची व्यवस्था करू. खायचे आमच्या सरकारचे आणि गायचे त्यांचे, हे चालणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# कात्रज परिसरात भरधाव टेम्पोच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

भरधाव टेम्पोच्या धडकेने एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पुणे–सातारा रस्त्यावरील कात्रज परिसरात मांगडेवाडीजवळ घडली. अपघातानंतर टेम्पोचालक पसार झाला आहे.

दीपाली वैभव बर्गे असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. या अपघातात पार्वती आदिनाथ वायदंडे (वय ५०, रा. मांगडेवाडी, कात्रज) आणि त्यांचे पती आदिनाथ जखमी झाले. याबाबत पार्वती यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून टेंपोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपाली, त्यांची मैत्रीण पार्वती आणि आदिनाथ शनिवारी (ता. ९) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास रस्त्याच्या कडेला गप्पा मारत उभे होते. त्यावेळी कात्रज घाटातून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या भरधाव टेम्पोने दीपाली यांना धडक दिली. त्यानंतर पार्वती आणि आदिनाथ यांना धडक देऊन टेम्पोचालक पसार झाला. अपघातानंतर नागरिकांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारादरम्यान दीपाली यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच वरिष्ठ निरीक्षक शरद झिने घटनास्थळी दाखल झाले. कात्रज भागातील सीसीटीव्ही चित्रीकरणाद्वारे टेम्पोचालकाचा शोध घेण्यात येत आहे.

# मराठा समाजाने आरक्षणाचे वास्तव समजून घ्यावे–राजेंद्र कोंढरे

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात सध्या विविध पक्ष, संघटना, सोशल मिडिया प्रसार माध्यमातून मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने विविध प्रकारचे दावे, प्रतिदावे, मांडणी, मागणी, आश्वासने दिली जात आहेत. त्यातून समाज, संभ्रम तयार होत आहेत. आरक्षणाच्या प्रश्नावरुन मराठा समाजाने संभ्रमित न होता वास्तव समजून सामोरे जाणे आवश्यक आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या पत्रकार परिषदेला महासंघाचे अमर पवार, गणेश मापारी, राकेश गायकवाड, आबा बाबर, श्रुतिका पाडळे, कामिनी मेमाणे, भाग्यश्री बोरकर, शामल मोहोळ आदी पदाधिकारी उपस्थित होते. कोंढरे म्हणाले, समाजाने आरक्षण विषयातील जेष्ठ विधीज्ञ, जात पडताळणी क्षेत्रातील तज्ञ, महसुल व सामाजिक न्याय विभागातील निवृत्त अधिकारी यांचेकडून यातील माहितीची खातरजमा करून घेऊन आपली नेमकी वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात जात निहाय जनगणना करून आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यावर वाढविण्याचे आश्वासन दिले जात आहे. देशात पटेल, जाट, गुजर, कापू, मराठा हि आंदोलने २००५ पासून सुरु आहेत, तसेच मागास प्रवर्गाचे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढविण्यासाठी घटना दुरुस्ती करण्यासाठी संसदेत सत्ता आणि बहुमताची आवश्यकता आहे.


भविष्यात जातनिहाय जणगणना झाली आणि त्यामध्ये ओ.बी.सी.चीं लोकसंख्या कमी आढळली तर २३ मार्च १९९४ च्या शासन निर्णयाने व सन २००४ च्या आरक्षण कायद्यामुळे दिले गेलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीची पुनर्रचना करण्याचे ठोस बचन मराठा समाजाला दिले जाणार आहेत का? याउपर शिल्लक राहणारे पुरेसे आरक्षण मराठा समाजाला देणे शक्य आहे का? यामुळे या भूमिकेचा मराठा समाजाला काही फायदा होणार नसल्याचे कोंढरे यांनी यावेळी सांगितले.

# पिकअप उलटून एक ठार, ११ जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

मजुरांना घेऊन जाणार्या पिकअपचालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप रस्त्यावर उलटला. या अपघातात एक वृद्ध महिला ठार झाली, तर तीन लहान मुलांसह ११ जण जखमी झाले. ही घटना रविवारी (दि. १०) सकाळी सहा वाजता पुणे–नाशिक हमरस्त्यावर मंचरजवळील निघोटवाडी बायपास येथे घडली.

याप्रकरणी मंचर पोलिसांनी पिकअपचालक बबन नामदेव मधे (वय ४५) याला ताब्यात घेतले आहे. सुमन महादू जाधव (वय ८०) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. भामाबाई बाळू कडाळे (वय ४०), मंदा संदीप गांगट (वय २२), कार्तिक सुरेश मधे (वय ३.५ वर्ष), आराध्या सुरेश मधे (वय ४ वर्ष), विठ्ठल सोमा दुधवडे (वय ५०), मनीषा शिवाजी भुतांबरे (वय ४०), सरू पांडू जाधव (वय ४४), शांताराम आनंद दुधवडे (वय ४०), यमुनाबाई शांताराम दुधवडे (वय ३५), हिराबाई येसू काळे (वय ४५), कृष्णा संदीप जाधव (वय ३ वर्ष) हे जखमी झाले.



नारायणगावजवळील वळणवाडी येथून चाकण–सावर्ली येथे भात कापणीसाठी पिकअपमधून (एमएच १४ एझेड ०९५१) मजुरांना घेऊन जात होता. निघोटवाडी बायपासजवळ समोरून आलेल्या पिकअपला हुलकावणी दिल्याने चालक बबन मधे यांचे नियंत्रण सुटून पिकअप रस्त्यावर उलटला. यात एका मजूर महिलेचा मृत्यू झाला, तर तीन लहान मुलांसह ११ जण जखमी झाले. पिकअपचालक बबन नामदेव मधे याला मंचर पोलिसांनी ताब्यात घेतले असून पोलिस कर्मचारी विलास हगवणे यांनी अपघातस्थळाचा पंचनामा केला आहे. जखमींमध्ये सर्व जण ठाकर समाजातील गरीब कुटुंबातील मजूर असून त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत.

# ससून रुग्णालयात आता रोबोट करणार शस्त्रक्रिया; वेळेची आणि खर्चाची होणार बचत

**पुणे । प्रतिनिधी**

रोबोटिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियांमध्ये अचूकता आली असून, वेळेची आणि खर्चाची बचत होत आहे. खासगी रुग्णालयांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढत आहे. आता ससून रुग्णालयाच्या सर्जरी विभागातही रोबोट दाखल होणार आहे. भारतीय बनावटीचा रोबोट खरेदी करणारे ससून हे राज्यातील पहिले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ठरले आहे.



तंत्रज्ञानातील अचूकता, नेमकेपणा, वेळेची बचत, कमी वेदना यामुळे रोबोटिक शस्त्रक्रियांना अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. सध्या खासगी रुग्णालयांमध्ये प्रामुख्याने सांधे बदलांच्या शस्त्रक्रियेमध्ये रोबोचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. आता हर्निया, गॉल ब्लॅडर, पोटाच्या, गायनॅकॉलिजकल अशा शस्त्रक्रिया रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केल्या जात आहेत. ससून रुग्णालयात गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात रोबोटिक आर्मच्या सहाय्याने पहिली शस्त्रक्रिया प्रायोगिक तत्त्वावर पार पडली. आता रोबोटिक शस्त्रक्रियांमध्ये ससूनने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

सध्या रोबोटिक सर्जरीबाबत देशात विविध प्रयोग केले जात आहेत. मात्र, रोबोटिक सर्जरी अतिशय महाग असते. विशेषत: खासगी रुग्णालयांमध्ये रोबोटिक सर्जरीसाठी लाखो रुपयांचा खर्च होतो. गरीब रुग्णांना एवढा खर्च करणे शक्य नसते. त्यामुळे ससून रुग्णालयातील रोबोटिक शस्त्रक्रिया रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे.

# तडीपार गुंडास पिस्तुलासह अटक

**चाकण । प्रतिनिधी**

जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार केलेल्या गुंडास शुक्रवारी (त. ८) रात्री रात्री पावणे एकच्या सुमारास चाकणजवळील आळंदी फाटा (ता. खेड) येथे अटक करण्यात आली. त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूस आढळून आले.

याप्रकरणी हरिओम गणेश पांचाळ ( वय – २४, रा. आळंदी, ता. खेड) या गुंडाला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती चाकण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट तीनचे पोलिस शिपाई सागर बाळासाहेब जैनक (वय ३२) यांनी याबाबत चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पांचाळ याला पोलिस उपायुक्त परिमंडळ पिंपरी–चिंचवड यांनी दोन वर्षांकरिता संपूर्ण पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. मात्र त्याने कोणतीही परवानगी न घेता तो शहरात आला होता. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी त्याला सापळा रचून त्याला अटक केली.





**रहाटणी सौंदर्य कॉलनी प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय येथे दिवाळी निमित्त कार्यक्रम संपन्न या कार्यक्रमावेळी पिंपळे गुरवचे सामाजिक कार्यकर्ते राहुल जवळकर यांची मुख्य उपस्थिती होती तसेच उद्योजक विजय जगताप हे ही उपस्थित होते. रहाटणी सेवा केंद्राच्या राज योगिनी वर्षा दीदी यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**